म. ग्रं. सं. ठाणे
१९९९४
विषय कादंबरी
सं. क्र. १९९९४

१९९९४
कादंबरी

REFBK-0016975

# जि

मंगेश पाडगांवकर

काळे
११।३।७९
१९९४
काळे
११।३।७९
१९९४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

# जिप्सी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६७०५
ग्रं. क्र.

मंगेश पाडगांवकर

REFBK-0016975
REFBK-0016975

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© मंगेश पाडगांवकर

पहिली आवृत्ती
डिसेंबर १९५३ पौष १८७५

पुनर्मुद्रण
मे १९५९ वैशाख १८८१
ऑगष्ट १९६५ श्रावण १८८७
जून १९६८ ज्येष्ठ १८९०

प्रकाशक :
**गणेश रामराव भटकळ**
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी ताडदेव रोड
मुंबई ३४ डब्ल्यूबी

मुद्रक :
**म. मं. दळवी**
साहित्य सहकार मुद्रणालय
१७२ नायगाव क्रॉस रोड
दादर, मुंबई १४ डीडी

कवि बा. भ. बोरकर
यांस प्रेमादरपूर्वक—

# ‘ जिप्सी ’च्या निमित्ताने

‘ धारानृत्य ’ मधील मंगेश पाडगावकरांची कविता ही संपूर्णपणे त्यांची नव्हती. ती वाचीत असताना तिच्यातून घुमणारे बोरकर–कुसुमाग्रजांच्या कवितांचे सूर अजिबात मनावेगळे करणे अशक्य होते. ‘ धारानृत्य ’ मधील कवितांमागील आत्मनिष्ठा प्रबल होती; तिच्यात अप्रामाणिकपणाचा भाग यत्किंचितही नव्हता; तिच्यामागील उत्साह प्रचंड होता; परंतु त्या कवितांना जन्म देणारी पाडगावकरांची प्रतिभाच अद्याप बाल होती : बोरकर–कुसुमाग्रजांच्या काव्यरीतींचे ती प्रत्यक्ष अनुकरण करीत नसली तरी त्या रीतींनी तिचे नेत्र दिपून गेले होते; स्वाभाविकच तिने मारलेल्या भराऱ्या अद्याप संपूर्णपणे तिच्या स्वतःच्या होऊ शकत नव्हत्या. त्यांत मधूनच बोरकर. कुसुमाग्रजांच्या–विशेषतः बोरकरांच्या—पंखांची फडफड ऐकू येत होती. पाडगावकरांचे कविमन आकार घेत होते; परंतु त्याला आपले स्वतःचे भावविषय अद्याप संपूर्णपणे सापडले नव्हते; ज्या कवितेने त्यांचे मन त्या काळात भारून टाकले होते त्या कवितेचे भावविषय हेच आपाततः त्यांचे भावविषय बनत होते; एवढेच नव्हे तर, त्यांना नकळत त्या भावविषयांची त्यांची अनुभूती ही देखील सर्वस्वी त्यांची अशी बनत नव्हती. ती घेण्याची पद्धतही अप्रत्यक्षपणे बोरकरांची होती. त्यामुळे ‘ धारानृत्य ’ मधील कविता वाचून कवीच्या कल्पनासामर्थ्याबद्दल, त्याच्या शब्दप्रभुत्वाबद्दल, त्याच्या चोखंदळ सौंदर्यदृष्टीबद्दल आणि जीवनातील

श्रेष्ठ मूल्यांवरील त्याच्या प्रबल श्रद्धेबद्दल जरी रसिकांना उदंड कौतुक वाटले व त्यांनी त्याचे सहर्ष अभिनंदन केले तरी त्यांच्या अन्तर्मनात कोठे तरी थोडीफार रुखरुख राहून गेली : जे भावानुभव कवी अभिव्यक्त करीत होता त्यांत त्याचा स्वतःचा असा वेगळेपणा त्यांना क्वचितच जाणवत होता; त्यांत खऱ्याखुऱ्या व्यक्तित्वाच्या प्रकटीकरणातून अवतरणारी अभिनवता अद्याप यावयाची होती. आपले स्वतःचे कल्पनाविश्व अद्याप कवीच्या प्रतिभेला सापडावयाचे होते.

'जिप्सी'मधील कविता वाचताना हे कल्पनाविश्व कवीला सापडले आहे ह्याचा निश्चित प्रत्यय येतो. आज पाडगावकरांच्या कवितेचे कल्पनाविश्व हे खास तिचे असे कल्पनाविश्व आहे. त्यांची प्रतिभा आज संपूर्णपणे स्वयंप्रकाशी बनली आहे. आपल्या विकासमार्गावर पाउले टाकताना तिला अनेक कवींच्या कवितेने आकर्षून घेतले : बालकवी, बोरकर, कुसुमाग्रज यांची कविता पाहून तिला अननुभूत आनंद झाला; ती वेळोवेळी त्यांच्या चिंतनात रंगून गेली हे खरे; परंतु ह्या चिंतनाने ती परोपजीवी बनण्याऐवजी अधिक समृद्ध, अधिक सतेज झाली : आत्मसामर्थ्य वाढविण्याकडेच तिने त्याचा उपयोग केला; आपल्या प्रकृतीला आवश्यक असा जीवनरस ती या चिंतनातून अप्रत्यक्षपणे वेळोवेळी शोषून घेऊं शकली. 'जें रम्य तें बघुनिया मन होय जागं' हीच पाडगावकरांची सहजवृत्ती : तोच त्यांचा सहजधर्म आहे; म्हणूनच या रम्यत्वाच्या, सौंदर्याच्या सतत चिंतनानें त्यांच्या प्रतिभेने आपल्या ठिकाणची नवसत्य व नवसौंदर्य ओळखण्याची व व्यक्त करण्याची शक्ती प्रतिक्षणी वाढविली. आज ही प्रतिभा शक्तिमान झाली आहे : आपले स्वतःचे असे आगळे कल्पना-विश्व तिने निर्माण केले आहे. तिजबरोबर ह्या कल्पना-विश्वात वावरताना रसिकांना आज त्यातील अभिनव सौंदर्य जाणवल्याखेरीज राहणार नाही : त्यांच्या चित्तवृत्ती हलवून सोडण्याचे सामर्थ्य ह्या कल्पना-विश्वात खात्रीने आहे.

आज ह्या कल्पना-विश्वाचे व हे कल्पना-विश्व ज्या प्रतिभेने निर्माण केले त्या प्रतिभेचे स्वरूप न्याहाळण्यात मौज आहे : पाडगावकर हे एक खऱ्याखुऱ्या अर्थाने सौंदर्यजीवी आणि भावजीवी कवी आहेत. सगळेच कवी सौंदर्यजीवी आणि भावजीवी असतात; परंतु पाडगावकरांच्या कवितांमधून आज त्यांचे सौंदर्यजीवी व भावजीवी मन विशेषत्वानेच प्रगट होताना दिसते; त्यांच्या आजच्या कवितेत गोचर सौंदर्य हे आपोआपच भावरूप बनते व भाव सौंदर्यरूप

बनतात. बालकवींप्रमाणेच पाडगावकर निसर्गात सहजगत्या रंगून गेलेले आहेत : निसर्गाची बदलती रूपे अवलोकणे, त्यांतील रंगांच्या, रूपांच्या, गंधांच्या, छाया-प्रकाशाच्या, सूक्ष्म—अतिसूक्ष्म हालचालींच्या विविध छटांतील सौंदर्य टिपून घेणे हा त्यांच्या मनाचा सहजधर्म आहे. ह्या सौंदर्याचे चिंतन करणे, त्याचा आशय समजावून घेणे, त्याने बेहोष होणे, हा त्यांच्या प्रतिभेचा आवडता व्यवसाय आहे. बालकवींप्रमाणेच पाडगावकरांचा निसर्गाशी अगदी सहजगत्या हृदयसंवाद होऊ शकतो : निसर्ग त्यांचेबरोबर हसू शकतो, रडू शकतो, उडूबागडू शकतो आणि तेही निसर्गाबरोबर हसू शकतात, रडू शकतात, उडूबागडू शकतात; परस्परांची भाषा परस्परांना कळते; आणि म्हणूनच ते जेव्हा आपले भावानुभव अभिव्यक्त करू पाहतात तेव्हा निसर्ग त्यांच्या मदतीला झटकन् धावून येतो; तोच त्यांच्या प्रतिभेला भावसूचक कल्पनाचित्रे पुरवितो. निसर्गसौंदर्याचे आकंठ पान केलेले त्यांचे मन त्याच्याच भाषेत बोलू लागते. हे जसे घडते त्याच-प्रमाणे ते जेव्हा एखाद्या निसर्गदृश्यातील गोचर सौंदर्याने वेडे होऊन त्याचे चित्र रेखाटू लागतात तेव्हा ते आपोआपच निसर्गाबरोबरच त्यांच्या मनाचेही चित्र होते : ज्या भाववृत्तीतून त्यांनी ते सौंदर्य अवलोकिलेले असते किंवा त्या विशिष्ट सौंदर्याच्या चिंतनाने जी भाववृत्ती निर्माण झालेली असते त्या भाववृत्तीची (mood) डूब आपोआपच त्या सौंदर्याला दिली जाते; त्या भाववृत्तीच्या विरळ धुक्यातून ते सौंदर्य अधिकच मनोरम भासते; खऱ्याखुऱ्या अर्थाने ऐंद्रिय सौंदर्य भावरूप बनते.

पाडगावकरांच्या कविता चाळताना अगदी सहजगत्या हाती लागलेली पुढील काही शब्दचित्रे आहेत : **खिन्न आंधळा अंधार,...पर्णांत हसणारा वारा,...गहिंवरलेल्या प्रकाशांत मिळणारें दहिंवर,...सुगंधांत थरथरणारा गोड कोवळा गारवा,...दिशांतून उमलणारा निळा सोनेरी गौरव,... शिशिरांतल्या उत्तररात्रीं मनांत झुरणारें आकाश,...पानांमधून ठिबकणारें ओलें चांदणें,...अबोल धुकें, व्याकुळ लाटा, आर्त उदास रात्र,...स्तिमित होऊन अवचित थबकणारा वारा,...दवांत दडलेलें रत्नजडित गुपित.** पाडगावकरांच्या कवितांमधील ही शब्दचित्रे ज्या प्रतिमा आपल्या डोळ्यांपुढे निर्माण करितात त्या निसर्गाच्या विभ्रमाच्या प्रतिमा आहेत हे जसे आपणास जाणवते तसेच त्या भावजीवी व सौंदर्यपिपासू अशा एका कविमनाच्याही प्रतिमा

होत हेही जाणवते : ह्या प्रत्येक प्रतिमेतून निसर्गाचे सौंदर्य कवीच्या भाववृत्तीचे (mood) तरल आवरण अंगावर घेऊन जणू आपणासमोर अवतरते; त्यामुळे निसर्ग हा खऱ्याखुऱ्या अर्थाने सजीव होतो : त्याचे सौंदर्य, त्याचे विभ्रम हे सचेतन होतात. पाडगावकर ही निसर्गचित्रे रेखाटताना शब्दांचो अशा प्रकारे गुंफण करितात की, सौंदर्य हे अगदी सहजपणे भावरूप होते. त्या शब्दांमध्ये ज्याप्रमाणे मोजकेपणा असतो व त्यांचा न्यास अत्यंत अर्थपूर्ण असतो, त्याच-प्रमाणे विशिष्ट रंग, रूप, आकार, गती, स्पर्श ह्यांत दडलेल्या सौंदर्याची भावपूर्ण सूचना देण्याचे सामर्थ्य त्यांमध्ये असते.

ते स्वतःच म्हणतात त्याप्रमाणे

**दवबिंदूंतिल हळवें स्पंदन**
**जाणिवेंत कधि टिपून घेतो,**
**गडद निराकाराची किमया**
**कधिं शब्दांतून फुलवित बसतो !**

किंवा

**तें किती लपविलें तरिही**
**मज नकळत कळतें कळतें**
**पाकळ्यांत दडलें तरिही**
**गंधांतुन गूढ उकलतें**

निसर्गसौंदर्याचे हे 'गूढ' त्यांना ह्याप्रमाणे अगदी सहजगत्या उकलत असल्यामुळे

**प्रतिबिंबच अस्फुट नुसतें**
**जरि शब्दांतुन भिरभिरतें**
**मौनांत परी हृदयींच्या**
**कधिं पहाट होऊन येतें**

आणि मग ते निसर्गाचे सूक्ष्मतरल सौंदर्य अत्यंत नादमधुर परंतु मोजक्या अर्थपूर्ण शब्दांत टिपून घेण्याची शक्तीही पाडगावकरांच्या प्रतिभेच्या ठिकाणी जणू आपोआपच अवतरते : त्यांच्या कवितेची भाषा खऱ्या अर्थाने चित्रमयी होते, त्या 'पहाट होऊन' झालेल्या सौंदर्याच्या प्रतिबिंबाला वरच्यावर झेलून घेण्याची शक्ती त्या भाषेच्या ठिकाणी येते.

आपल्या सूक्ष्मकोमल भावनानुभवांचे सौंदर्य न्याहाळण्याची, आस्वादण्याची व अभिव्यक्त करण्याची शक्ती पाडगावकरांचे ठिकाणी आहे. विविध भाव-वृत्तींची चित्रे त्यांच्या कवितांमधून प्रकट होताना दिसतात : कधी ही भाव–वृत्ती प्रसन्न उत्फुल्ल असते तर कधी ही उदास, खिन्न असते, परंतु ह्या भाव–वृत्तींचे दर्शन ते ज्या प्रतिमांच्या द्वारा घडवितात त्या प्रतिमा मात्र निसर्ग–दृश्यांच्याच असतात : मग संध्याकाळ ' उदास ' बनते, दूरचा माळ ' खिन्नपणा पांघरून ' झुरत बसतो, आभाळ ' फिकट पांढरी चंद्रकोर उरीं जपत ' बसते. जणू निसर्गप्रतिमांच्या मदतीशिवाय पाडगावकरांच्या प्रतिभेला बोलणेच अशक्य होत असावे. ' क्षणपुष्पांच्या सरी, ' ' संथ निळें पाणी, ' ' शांत किनारा, ' रात्र भिजली ' ' अजून व्हायची आहे पहाट ! ' ह्यांसारख्या अनेक कवितांमधून जी बोलकी निसर्ग-चित्रे रेखाटलेली आढळतात ती काही अस्फुट परंतु उत्कट भावानुभवाचीच शेवटी रेखीव चित्रे ठरतात.

' जिप्सी 'मधील पुष्कळशी कविता ही विशुद्ध प्रेम–कविता आहे : प्रेम–भावाच्या विविध छटांचे आणि वृत्तींचे (moods) हळुवार दर्शन आपणास तिजमधून होते. प्रेम–भाव हा एक गंभीर भाव आहे; सर्व मन व्यापून टाकण्याची शक्ती ह्या भावाच्या ठिकाणी आहे : त्याचा जोश, त्याने निर्माण होणारी हुरहूर, त्याची अबोधता, मुग्ध आणि विमुक्त ह्या दोन्ही वृत्तींचा त्याच्या अधिराज्यात येणारा सुखद अनुभव, त्याची शारीर बाजू व तिच्याशी संलग्न असणारे विविध अनुभव ह्यांत सामावलेले भावसौंदर्य ही कविता व्यक्त करू पाहते. पाडगावकरांच्या इतर कवितांप्रमाणे ही देखील विविध भाववृत्तींची (moods) चित्रे रेखाटणारी कविता आहे; आणि त्यांच्या इतर कवितांप्रमाणे ह्याही कवितेत त्यांची प्रतिभा निसर्गप्रतिमांतूनच बोलत आहे : मला वाटते, एखाद्या भावानुभवातून सौंदर्य न्याहाळताना, त्यांचे चिंतन करिताना पाडगावकरांच्या प्रतिभाचक्षूंपुढे समान भावसूचक निसर्गदृश्यें आपोआप तरळू लागत असावीत व मग ते

> **तूं उधळावें**
> **पाकळ्यांतलें निर्मळ मार्दव**
> **सदाफुलीपरि**
> **सदा तुझें फुलणारें लाघव**

तुझी गूढता
मध्यरात्रिच्या आकाशापरि
पटवित ओळख
पसरत यावी स्निग्ध अंतरीं
किंवा
सांगितलेंस गुपित
पहाटेच्या दवापरी
हळु तृणाच्या कानांत.

कळीपरी नकळत
पानाआड दडूनच
फुललीस अवचित.

असे आपल्याशीच गुणगुणत असावेत. आपल्या मनातील ते 'थरथरणारे' भावसौंदर्य त्याच्या कोमलतेला, सजीवतेला ढका न लागता व्यक्त करणे किंवा त्यांच्या शब्दांत बोलावयाचे झाल्यास 'लाटांमधल्या प्रतिबिंबांचे गूढ इशारे' विणणे किती कठीण आहे ह्याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे :

गुपित अनिर्वच निःशब्दांचें
शब्दांच्या सीमेवरलें तें
जाणवतें पण हाय ! मिळेना...
असून हातीं अतीत उरतें !

ह्या त्यांच्या शब्दांतून ही जाणीव व्यक्त होतेच, पण तशीच ती त्यांची अनेक कवितांच्या प्रकृतीतूनही व्यक्त होते; ह्या कवितांच्या अवतारात एक प्रकारची अपरिहार्यता आहे हे आपणास जाणवते. त्यांचे सौंदर्य हें त्याजमधून पदोपदी व्यक्त होणाऱ्या सौंदर्यदृष्टीमध्ये जसे आहे तसेच ते ज्या अर्थपूर्ण भावानुभवांचे त्या कविता आपणास दर्शन घडवितात त्या भावानुभवांच्या 'थरथरणाऱ्या' सजीवतेत आहे. सकाळी उठताच अंगणातील फुलझाडावर अर्धवट उमललेले किंवा संपूर्ण उमलून वाऱ्यावर डुलणारे फूल दिसावे; त्या फुलाच्या रूपाने प्रकट होणाऱ्या सौंदर्याचा अवतार हा जसा अनपेक्षित परंतु अपरिहार्य असतो;

त्याच्या दर्शनाने चित्तवृत्ती ज्याप्रमाणे एकदम पुलकित होतात-अगदी तशाच प्रकारचा अनुभव एखाद्या विशुद्ध भाव–कवितेच्या सान्निध्यात येतो. पाडगावकरांच्या कवितेत — त्यांच्या प्रेम-कवितेत—हा साक्षात्कार घडविण्याचे सामर्थ्य आहे असे मनाला वाटते : एका विशुद्ध भावाची झुळुक त्यांच्यांतून आपल्या मनाला सुखद स्पर्श करून जाते.

पाडगावकरांना जीवनाची प्रचंड ओढ आहे. ही ओढ त्यांच्या कवितेतून ठिकठिकाणी व्यक्त झाली आहे; किंबहुना, असे म्हणावयास हरकत नाही की, त्यांची सगळीच कविता या ओढीतून जन्मलेली आहे. भावनेच्या एक प्रकारच्या जोशात ते जीवनाची गाणी गातात. हा भावनेचा जोश त्यांच्या शब्दाशब्दांतून व त्या शब्दांच्या गर्तातून आपल्या मनाची पकड घेतो; त्याच्या आवेगाने आपल्या मनाचे बांध ढासळून पडतात. आपल्याबरोबर वाचकांच्या मनालाही ओढून नेण्याची शक्ती पाडगावकरांच्या ह्या उक्तीत असते. ह्या जीवनाबद्दलच्या अखंड कुतूहलामुळेच, अखंड ओढीमुळेच आपण एक ‘ जिप्सी ’ आहोत असे त्यांस वाटते; ह्या ओढीमुळेच ‘ सुंदर आहे माझी वासना ! ’ हा साक्षात्कार त्यांच्या मनाला होतो व ह्या ओढीमुळेच ते ‘ पार्थिवते ’ चा बेहोष होऊन जयजयकार करितात : आपण आनंदयात्री आहोत,

**अफाट आकाश**
**हिरवी धरती**
**पुनवेची रात**
**सागर-भरती**

**पाचूंची लकेर**
**कुरणाच्या ओठीं**
**प्रकाशाचा गर्भ**
**जलवंती-पोटीं**
**अखंड नूतन मला ही धरित्री**
**आनंदयात्री मी आनंदयात्री**

असा आत्मसाक्षात्कार त्यांच्या मनाला होतो; व आपणास ओढ लावणाऱ्या ह्या जीवनातील विविध सौंदर्यांची ते बेहोष होऊन गाणी गातात. ही गाणी

ज्याप्रमाणे त्यांचा केवळ जीवनोत्साह काही वेळा व्यक्त करितात त्याचप्रमाणे काही वेळा ती जीवनामागील प्रेरक शक्तीचे त्यांना घडणारे दिव्य आभास व्यक्त करितात; अशा ठिकाणी पाडगावकरांच्या वाणीमध्ये श्रद्धेचे, निष्ठेचे, एका आगळ्या अनुभूतीच्या प्रतीतीचे सूर घुमू लागतात : ‘ आज जागें आहे मन ’, ‘ गाणें ’, ‘ दर्शन ’ इत्यादी त्यांच्या कवितांमधून आपणास हेच सूर ऐकू येतात. ही कविता केवळ निसर्ग–सौंदर्याच्या दर्शनाने स्फुरलेली कविता नाही; तिच्या मागे असणारे मन हे केवळ निसर्ग–सौंदर्याने वेडावलेले मन नाही; तर ह्या सौंदर्याच्या चिंतनातून ह्या सौंदर्याला प्रेरणा देणाऱ्या एका शक्तीशी संवादी होऊ पाहणारे हे मन आहे : हे मन जेव्हा

**पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार**

असा उद्गार काढते,

**तुला पाहिलें ऋतूऋतूंतुन, फळफळांतुन,**
**त्या गगनांतुन, या मातींतुन, स्थितीगतींतुन**
**संघर्षातुन, सुखदुःखांतुन, व्यथेव्यथेंतुन**
**या सृष्टींतुन अन् भवतींच्या मानवतेंतुन**
**रे कसें शोधुं तुज वेड्यापरि मी तुलाच टाकुन ?**
**मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं मज दे दर्शन.**

अशी ग्वाही देते किंवा त्या प्रेरक शक्तीला उद्देशून

**अरे, तुझ्या स्वागताई आज जागें आहे मन !**
**जशी तार सतारीची जागृत आतुर**
**कलाकाराचिया उस्फूर्त स्पर्शाच्यासाठीं...**
**फिरूं दे फिरूं दे तुझा हात;**
**उठूं दे उठूं दे झंकार झंकार**
**अणूंत अणूंत, परमाणूंत हवेच्या आहेस तूं**
**रोमारोमांत भूमीच्या, कोंबाकोंबांत बीजाच्या आहेस तूं !**

असे भावोद्गार काढते तेव्हा त्या उद्गारांमागील निष्ठेचे आणि साक्षात्काराचे सामर्थ्य वाचकांस प्रतीत झाल्यावाचून राहत नाही.

'जिप्सी' मधील काही कविता उत्कट विचारानुभव प्रकट करिताना दिसते : परंतु ह्या विचारानुभवांचा तोंडवळा न्याहाळला असता ते पाडगावकरांच्या भावजीवनातूनच अपरिहार्यपणे जन्माला आलेले विचारानुभव आहेत हे लक्षात येते. त्यामुळे त्यांचे भावगर्भ आणि उत्कट रूप जसे जाणवते तशीच त्यांची मर्यादित कक्षाही जाणवते : आपले वैयक्तिक प्रेमजीवन आणि निसर्ग-प्रेमातून अनुभवास येणारे भावजीवन हेच आज पाडगावकरांच्या प्रतिभेचे प्रामुख्याने चिंतनविषय आहेत; ह्या चिंतनविषयांतून हे विचरानुभव जन्माला आलेले आहेत; आज त्यांची कक्षा एवढ्यापुरतीच मर्यादित आहे; 'जवळपणाचें झालें बंधन,' 'दुःख' 'हात हवे मज', 'कधीं पाहतों' ह्यांसारख्या कवितांतून व्यक्त होणाऱ्या उत्कट विचारानुभवांची जात हीच आहे. 'जवळपणाचें झालें बंधन' ह्यासारख्या कवितेमधून व्यक्त होणारा विचारानुभव श्रेष्ठ आहे व त्याची अभिव्यक्तीही अत्यंत काव्यात्म आहे. परंतु ह्या भावजीवनाच्या कक्षा ओलांडून त्याच्या पलीकडे असणाऱ्या अनंत अनुभव-विश्वाचे दर्शन अद्याप त्यांच्या प्रतिभेला व्हावयाचे आहे : तिची वृत्ती मूलतःच गंभीर आहे व त्यामुळे पुढेमागे ह्या अनुभवविश्वाचेही ती चिंतन करू लागणार हे उघडच आहे; तसे झाल्यावर श्रेष्ठ, श्रेष्ठतर विचारानुभवांचे दर्शनही ती आपणास निश्चित घडवील. आज तिचा विलास म्हणजे एका भावजीवी व सौंदर्यजीवी मनाचा आविष्कार ठरत आहे : भावानुभावांतून प्रकट होणारे सौंदर्य आणि प्राकृतिक सौंदर्यामधून प्रकट होणारी भाव-वृत्ती (mood) ह्यांची विविध दर्शने आज आपणास तिच्या विलासातून घडत आहेत. माझ्या मते आजच्या पाडगावकरांच्या कवितेचे हेच वैशिष्ट्य आहे.

वा. ल. कुलकर्णी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| जिप्सी | ... | १ |
| आतां उजाडेल | ... | ३ |
| गंधांतुन गूढ उकलतें | ... | ५ |
| आज | ... | ७ |
| चिरनूतन | ... | ९ |
| जर पहाटेच येणार तरी | ... | ११ |
| शिशिरामधल्या उत्तररात्रीं | ... | १३ |
| संथ निळें हें पाणी | ... | १५ |
| मी फूल तृणांतिल इवलें | ... | १७ |
| दुःख | ... | १९ |
| मी चंचल होउनि आल्यें. | ... | २० |
| आनंदयात्री | ... | २२ |
| हात हवे मज | ... | २४ |
| कधीं पाहतों | ... | २७ |
| धुक्यांत आम्ही कोरित बसतों | ... | २९ |
| विस्मरणाचें दान तुझें तें | ... | ३१ |
| तूं असतिस तर | ... | ३३ |
| तुझी निराळीच तऱ्हा | ... | ३४ |
| क्षणांत असल्या | ... | ३६ |
| ही उदास संध्याकाळ | ... | ३८ |
| व्यथा | ... | ४० |
| क्षणपुष्पांच्या सरी | ... | ४२ |
| निर्मिति | ... | ४४ |
| कधीं एकदां | ... | ४६ |
| शांत किनारा | ... | ४९ |
| किमया | ... | ५० |
| सत्कार | ... | ५२ |
| पांघरूण | ... | ५४ |
| निवांत | ... | ५६ |
| रात्र भिजली | ... | ५७ |

| | | |
|---|---|---|
| जय जय हे पार्थिवते ! | ... | ५८ |
| अजून व्हायची जरी पहाट | ... | ६२ |
| माझे पंख मागूं नको | ... | ६४ |
| दर्शन | ... | ६६ |
| आज जागें आहे मन | ... | ६८ |
| अलगूज | ... | ७१ |
| अशा वेळीं | ... | ७४ |
| जवळपणाचें झालें बंधन | ... | ७६ |
| गाणें | ... | ७८ |
| दुपार एकटी जळे | ... | ८० |
| अहो जग पुढें गेलें | ... | ८१ |
| भार | ... | ८३ |
| पळवाट | ... | ८५ |
| मज नव्हतें ठाउक | ... | ८७ |
| सुंदर आहे माझी वासना | ... | ९० |
| हरवलें गीत मिळे | ... | ९४ |
| कसें काय अन् कोठें चुकलें | ... | ९६ |
| तुज आठवतें का | ... | ९८ |
| फुंकर | ... | ९९ |
| विषाद | ... | १०० |
| गहन तुझ्या डोळ्यांत खोल बुडतांना | | १०१ |
| बरेच दिवस | ... | १०३ |
| प्रतीक्षा | ... | १०५ |
| भीति | ... | १०६ |
| धुक्याचा हा पूल | ... | १०८ |
| थेंब | ... | ११० |
| अकस्मात | ... | १११ |
| काळी कड सावलीची | ... | ११३ |
| कसरत | ... | ११४ |
| खडक | ... | ११६ |

दा. क

# जिप्सी

एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

आठवतें बालपण जेव्हां होतों मी खेळत
होतों बांधीत मी घर सवंगड्यांच्या संगत
कौलें पानांचीं घराला आणि झावळ्यांच्या भिंती
आठवतें अजूनहि होतों रंगत मी किती !

पण अकस्मात होतों जात सारें उधळून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

शाळेंतले ते दिवस पाटी-पुस्तक हातांत
टोपी जरीची सुंदर...स्वारी निघाली थाटांत
जाड काचेची चाळिशी लावूनिया डोळ्यांवर
होते बोलत पंतोजी उग्र रोखून नजर
पण ठरेचना मन चार भिंतींच्या जगांत
उडे खिडकीमधून दूरदूरच्या ढगांत
झाडें पानांच्या हातांनीं होतीं मला बोलावीत
शेपटीच्या झुबक्यानें खार होती खुणावीत

कसें आवरावें मन ? गेलों पळून तिथून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

आणि पुढें कशासाठीं गेलों घर मी सोडून ?
सारीं सारीं सुखें होतीं, कांहीं नव्हतेंच न्यून
पण खोल खोल मनीं कुणी तरी होतें दुःखी
अशा सुखांत असून जिप्सी उरला असुखी

दिसूं लागले डोंगर जरा मिटतां लोचन
तिथें कुणी तरी मला नेऊं लागलें ओढून
मिटलेल्या डोळ्यांपुढें खळखळणाऱ्या लाटा...
सळसळणारीं पानें...दूर पळणाऱ्या वाटा
वाटांसवें त्या पळालों सारें कांहीं झुगारून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

कधीं कधीं पहाटते उरीं आगळी प्रतीती
जाळीमधून धुक्याच्या तेज झिरपतें चित्तीं
जाचूं लागते जिप्सीला ज्ञात विश्वाची चौकट
आणि जाणवतें कांहीं गूढ...अंधुक...पुसट!
खेळ मांडिलेला सारा पुन्हा उधळाया सजे
आपणच निर्मिलेलें आपणच मोडूं धजे
गूढ अज्ञात धुक्यांत आणि जातसे बुडून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

घर असूनहि आतां घर उरलेलें नाहीं
चार भिंतींची जिप्सीला ओढ राहिलेली नाहीं
कुणीं सांगावें? असेल पूर्वजन्मींचा हा शाप
घडी सुस्थिरपणाची विसकटे आपोआप...
कुणी तरी साद घाली दूर अनंतामधून...
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून

काकावाडी : वर्धा
३-१०-५२

# आतां उजाडेल!

आतां उजाडेल!

खिन्न आंधळा अंधार
आतां ओसरेल पार
लहरींत किरणांची कलाबूत मोहरेल
आतां उजाडेल!

शुभ्र आनंदाच्या लाटा
गात फुटतील आतां
मृदु गळ्यांत खगांच्या किलबिल पालवेल
आतां उजाडेल!

वारा हसेल पर्णांत
मुग्ध हिरवेपणांत
गहिंवरल्या प्रकाशीं दहिंवर मिसळेल
आतां उजाडेल!

आनंदांत पारिजात
उधळील बरसात
गोड कोंवळा गारवा सुगंधांत थरारेल
आतां उजाडेल!

फुलतील नकळत
कळ्यांतले देवदूत
निळा-सोनेरी गौरव दिशांतून उमलेल
आतां उजाडेल !

निळें आकाश भरून
दाही दिशा उजळून
प्रकाशाचें महादान कणाकणांत स्फुरेल
आतां उजाडेल !

आज सारें भय सरे
उरीं ज्योतिर्मय झरे
पहाटेचा आशीर्वाद प्राणांतून उगवेल
आतां उजाडेल !

मुंबई
८–७–५०

# गंधांतुन गूढ उकलतें

तें किती लपविलें तरिही
मज नकळत कळतें कळतें
पाकळ्यांत दडलें तरिही
गंधांतुन गूढ उकलतें

मातींत गाढ निजलेलें
जरि बीज न नयनां दिसतें
घन वळतां आषाढाचे
मज नवखी चाहुल येते

रात्रीच्या घन अंधारीं
जरि गहनच सगळें असतें
तें निःशब्दाचें कोडें
मज नक्षत्रांतुन सुटतें

श्रावणांत चित्रलिपीचे
जरि अर्थ न कळले पुरते
तरि ऋतुचक्रापलिकडचें
प्राणांत उमलतें नातें

लहरींतुन थरथरणाऱ्या
जरि भुलवित फसवित पळतें
पावसांत उत्तररात्रीं
मज अवचित लय उलगडते

प्रतिबिंबच अस्फुट नुसतें
जरि शब्दांतुन भिरभिरतें
मौनांत परी हृदयींच्या
कधिं पहाट होउनि येतें

दूरांत पलिकडे जेव्हां
हळु गगन धरेला मिळतें
त अद्भुत मज कळल्याची
वेदनाच नुसती उरते

तें किती लपविलें तरिही
मज नकळंत कळतें कळतें
पाकळ्यांत दडलें तरिही
गंधांतुन गूढ उकलतें

मुंबई
३१-७-५०

# आज

आज तुझ्या लोचनांत
मला दिसलें आकाश
गूढ निरोप घेऊन
आज आले तुझे श्वास

आज तुझिया स्पर्शांत
कांहीं निराळ्याच खुणा :
भारावली अमृतानें
ज्यांत जन्मांची वेदना

आज तुझिया बोलांत
सीमा सरून शब्दांची
नकळत उमलली
पहाट ही निःशब्दाची

आज निराळेंच भासे
तुझ्या अधरींचें स्मित
लकेरच चांदण्याची
जणुं भिजली दंवांत

आज तुझ्या पावलांत
झालें भविष्य चकित
फलभारें जड झाला
निळा सोनेरी एकांत

आज तुझ्या रूपांतून
झाला अरूपाचा भास
उरीं पहाटेआधींच
जाग आली प्रकाशास

मुंबई
१२-१०-५०

# चिरनूतन

ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

मृदुल उन्हाचें भिजवित रेशिम
ये कधि रिमझिम श्रावणसरिसम
अर्ध-उमलल्या फुलांभोवतीं हांसत फेर धरून
ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

कधि फुटणाऱ्या या लाटांपरि
कधि हळव्या हिरव्या वाटांपरि
चांदण्यांत कधि कलश ढगांचे कांठोकांठ भरून
ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

कधि निजलेल्या बीजांमधुनी
नवा उमलता प्राण होउनी
मृद्गंधांतुन नवसृजनाचें आश्वासन मिरवून
ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

कधि ललकारत आम्रवनांतुन
'कुहूकुहू' गंधांत कालवुन
नव्या वसंतापरी अचानक प्राणांतुन उमलून
ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

कधीं पहाटे वाहत वाहत
फेनाच्या विस्मयांत नाहत
ये तुझिया स्पर्शाचें कांचन निळ्या जळीं मिसळून
ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

यंत्रापरि हें होतां जीवन
मंत्रापरि ये हृद्गर्भांतुन
हे चिरयौवन, अखंडनूतन! जीवनघन वरसून
ये नवीन होऊन पुन्हा तूं, ये नवीन होऊन

मुंबई
१९-१०-५०

# जर पहाटेच येणार तरी

जर पहाटेच येणार तरी
ये धुकें होउनी गहन निळें
रे, नकळत तव करुणेपरि जें
दंव होउनि हरित तृणीं निथळे

जर येणारच रात्रीं तर ये
तूं होउन थरथर पर्णांची
जी शब्दांच्या पुढची…पुढची
जणुं ओढ अनिर्वच प्राणांची

जर फुलापरी येणार तरी
तृणपुष्प होउनी ये इवलें
जें घेउनि आशीर्वाद निळा
भक्तीपरि नकळत सहज फुले

जर ध्यानांतुन येणार तरी
ये मुग्ध करित तारे, वारे
गिरि सहज-समाधिंत असतांना
प्रार्थनेंत असतां तरु सारे

ये रंगांतुन येणार तरी
उरिं घेऊन त्यांच्या पलिकडलें
जें सुखवित भुलवित या नयनां
ज्योतिर्मय होउनि दूर पळे

जर येणारच तर उमलुन ये
मजभंवतींच्या सृष्टींतुन तूं
सृजनाचें स्पंदन होउनि ये
रस-रंग-नाद-गंधांतुन तूं

ये फुलांफळांतुन विकसत रे
ये ऋतूऋतूंतुन रंगत तूं
ये पवनासंगे वाहत तूं
अन् जलधारांतुन नाहत तूं

पण पहाटेच येणार तरी
ये धुकें होउनी गहन निळें
रे, नकळत तव करुणेपरि जें
दंव होउनि हरित तृणीं निथळे !

मुंबई
२२–१२–५०

# शिशिरामधल्या उत्तररात्रीं

शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे,
निष्पर्ण तरूंच्या भोंवतीं वारा उदास होऊन फिरे !

दुरून एकला तारा
करितो गूढ इषारा
गहन कोषांत तमाच्या उरीं कुणाची वेदना स्फुरे ?
शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे !

फुटती व्याकुळ लाटा
शोधीत स्वप्नींच्या वाटा
मनांत प्राणांत घुमून ध्वनी विराट लयींत विरे
शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे !

कुणाची नीरव भाषा
भारिते अथांग निशा ?
गिरींत दरींत, दूरच्या वनीं अंधार अजून उरे
शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे !

दाटून राहिलें धुकें
भोंवतीं अबोल मुकें
मधेंच उडत विचित्र पक्षी तमाच्या कुशींत शिरे
शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे !

भरून आकाश, दिशा
कुणाची सृजन-तृषा ?
साऱ्याच सृष्टींत रितेपणाची वेदना व्यापून उरे
शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे !

शिशिरामधली रात्र
उदास आर्त विचित्र !
सुनेपणावर ढाळीत बसे दंवाचीं कोंवळीं फुलें
शिशिरामधल्या उत्तररात्रीं आकाश मनांत झुरे
निष्पर्ण तरूंच्या भोंवतीं वारा उदास होऊन फिरे !

मुंबई
३१-१-५१

# संथ निळें हें पाणी

संथ निळें हें पाणी
वर शुक्राचा तारा
कुरळ्या लहरींमधुनी
शीळ घालितो वारा

दूर कमान पुलाची
एकलीच अंधारीं
थरथरत्या पाण्याला
कसलें गुपित विचारी ?

भरुन काजव्यांनीं हा
चमके पिंपळ सारा
स्तिमित होउनी तेथें
अवचित थबके वारा !

किरकिर रातकिड्यांची
नीरवतेस किनारी
ओढ लागुनी छाया
थरथरती अंधारीं !

मधेंच क्षितिजावरुनी
वीज लकाकुनि जाई
अन् ध्यानस्थ गिरीही
उघडुनि लोचन पाही !

हळुच चांदणें ओलें
ठिबके पानांमधुनी
कसला क्षण सोनेरी
उमले प्राणांमधुनी !

संथ निळें हें पाणी
वर शुक्राचा तारा
दरवळला गंधानें
मौनाचा गाभारा !

पुणें
७–६–५१

# मी फूल तृणांतिल इवलें

जरि तुझिया सामर्थ्यानें
ढळतील दिशाही दाही
मी फूल तृणांतिल इवलें
उमलणार तरिही नाहीं

शक्तीनें तुझिया दिपुनी
तुज करितिल सारे मुजरे
पण सांग कसें उमलावें
ओठांतिल गाणें हसरें ?

जिंकील मला दवबिंदू
जिंकील तृणाचें पातें
अन् स्वतःस विसरुन वारा
जोडील रेशमी नातें

कुरवाळित येतील मजला
श्रावणांतल्या जळधारा
सळसळून भिजलीं पानें
मज करितिल सजल इषारा

रे तुझिया सामर्थ्यानें
मीं कसें मला विसरावें ?
अन् रंगांचें गंधांचें
मीं गीत कसें गुंफावें ?

येशिल का सांग पहाटे
किरणांच्या छेडित तारा :
उधळीत स्वरांतुन भवतीं
हलु सोनेरी अभिसारा ?

शोधीत धुक्यांतुन मजला
दवबिंदू होऊनि ये तूं
कधिं भिजलेल्या मातीचा
मृदु सजल सुगंधित हेतू !

तूं तुलाच विसरुन यावें
मीं तुझ्यांत मज विसरावें
तूं हंसत मला फुलवावें
मीं नकळत आणि फुलावें

पण तुझिया सामर्थ्यानें
ढळतील दिशा जरि दाही
मी फूल तृणांतिल इवलें
उमलणार तरिही नाहीं

मुंबई
२८-६-५१

# दुःख

या माझ्या पंखांनीं
उडण्याचें वेड दिलें
पण माझ्या हातांनीं
घरटें हें निर्मियलें

जगण्याची ओढ अशी
उडण्याचें वेड असें
घरट्याच्या लोभांतहि
गगनाचें भव्य पिसें

व्योमांतुन उडतांना
ओढितसे मज घरटें
अन् उबेंत घरट्याच्या
क्षुद्र तेंच मज गमतें

हें विचित्र दुःख असें
घेउनि उरिं मी जगतों
५ घरट्यांतुन, गगनांतुन
शापित मी तगमगतों

मुंबई
३०-७-५१

# मी चंचल होउनि आल्यें

मी चंचल होउनि आल्यें
भरतीच्या लाटांपरि उधळित जीवन स्वैर निघाल्यें

फुलवुनि गात्रीं इंद्रधनुष्यें
क्षितिज विंधुनी धुंद कटाक्षें
चिरघळलेले नवथर उन्मद चंद्रकिरण मी प्याल्यें
मी चंचल होउनि आल्यें

आषाढांतिल घनापरी मी
गर्जत बरसत विराट व्योमीं
अस्तित्वाच्या लंघुनि सीमा उधळुनि प्राण निघाल्यें
मी चंचल होउनि आल्यें

धूसर अंधारांतुन शोधित
पिशापरी मी मम चिरवांछित
शुक्राच्या प्रतिबिंबापरि मी स्वप्न जळाचें झाल्यें
मी चंचल होउनि आल्यें

श्रावणाचिया अधरीं लपुनी
रिमझिमणाऱ्या धारांमधुनी
पानांवरचे पुसून आसूं उर्वशीच मी हसल्यें
मी चंचल होउनि आल्यें

नजराणे घेऊन ऋतूंचे
हृदयांतिल गंधित हेतूंचे
आकाशाची प्रिया कधीं मी होउनि लाजत सजल्यें
मी चंचल होउनि आल्यें

मी शब्दांना फसवुनि हसल्यें
रंगांना भुलवून निसटल्यें
विहग स्वरांचे माझी छाया शोधित वणवण फिरले
मी चंचल होउनि आल्यें

जन्ममृत्युचें लंघुनि कुंपण
स्थलकालाच्या अतीत उमलुन
प्रवासिनी मी चिरकालाची अनाघ्रात ही उरल्यें
मी चंचल होउनि आल्यें

मुंबई
२३-९-५१

# आनंदयात्री

अफाट आकाश
हिरवी धरती
पुनवेची रात
सागर-भरती
पाचूंची लकेर
कुरणाच्या ओठीं
प्रकाशाचा गर्भ
जलवंती-पोटीं
अखंड नूतन मला ही धरित्री
आनंदयात्री मी आनंदयात्री

मेघांच्या उत्सवीं
जाहलों उन्मन
दवांत तीर्थांचें
घेतलें दर्शन
दूर क्षितिजाची
निळी भुलावण
पाशांविण मला
ठेवी खिळवून
अक्षयवीणाच घुमे माझ्या गात्रीं
आनंदयात्री मी आनंदयात्री

हलके काढून
कंटक पायींचे
स्वरांत विणिले
सर मीं स्वप्नांचे

हासत दुःखाचा
केला मीं स्वीकार
वर्षिलें चांदणें
पिऊन अंधार

प्रकाशाचें गाणें अवसेच्या रात्रीं
आनंदयात्री मी आनंदयात्री

मुंबई
२-१०-५१

# हात हवे मज

हात हवे मज नाजुक सुंदर
जुइपुष्पांपरि ज्यांचें मार्दव
श्रावणांतल्या उन्हापरी अन् ज्यांचें लाघव!
स्पर्श जयांचा स्पर्शमण्यापरि
अवखळ चंचल जे लाटांपरि
दडलें ज्यांतुन
प्रमत्त यौवन
पुनवेच्या उत्फुल्ल रात्रिचें रजत निमंत्रण

हात हवे मज नितांत वत्सल
क्षमाशील जे क्षमेहुनीही
पुण्यशील जे गंगेहुनिही
जे मायेचा घास भरविती चिमण्या ओठीं
जे चुकलेल्या पांथस्थांना दीपच होती!
हात अन्नपूर्णेचे असले!
साफल्याचें अन् तृप्तीचें
ब्रीद जयांचें या धरणीपरि
सदैव ज्यांची वत्सल पाखर आकाशापरि!

हात हवे मज तसले कणखर
कर्मयोग साकार ज्यांमधें
जे मातीमधिं बीज पेरिती
धगधगणाऱ्या उन्हांतही जे
नांगर धरिती, औत फिरविती!

खपती, श्रमती
जे यंत्रांवर, जे घाण्यांवर,
हातोड्यांवर अन् मोटेवर
अन् जे घाणीच्या पात्यांवर;
दिव्य उद्यांच्या मानवतेचे शिल्पकार जे !

हात हवे मज तसले अद्भुत
सृजनशील जे दिव्य कलाधर !
जे ब्रह्म्याशीं स्पर्धा करिती !
चितारिती जे
इंद्रधनूचें स्वप्न मुलायम !
छेडितात जे
पार्थिवतेंतुन गीत अपार्थिव !
स्पर्शें ज्यांच्या
शब्दांमधुनी
निःशब्दाचें गुपित उलगडे !
किमया ज्यांची
क्षुद्र असुंदर पाषाणांतुन
निराकार चिरसौंदर्याची घडवी मूर्ति !

हात हवे मज
खिस्तापरि ते पवित्र तसले !
वर्षेहुनि जे दयार्द्र असुनी,
कडाडणारा करांत आसुड घेउनि येती
क्रुद्ध विजेपरि आणि उगारिति
त्यांच्यावरतीं, केला ज्यांनीं
बाजारच मंदीर प्रभूचें;

[illegible] ग्रंथ संग्रहालय, [illegible]
२५ ७३८६१ [illegible]
९९/३/७०

विकिती जे बांधून खगांना,
मुक्त उडावें नभांत ज्यांनीं !
विकिले ज्यांनीं अपुले आत्मे
क्षुद्र आपुल्या स्वार्थासाठीं !
हात हवे मज
असे शुभंकर अन् प्रलयंकर
शांतिरूप जे
ज्यांत जळे परि विराट संगर !

हात हवे मज तसले मंगल :
मध्यरात्रिच्या प्रशांत प्रहरीं
जग सारें निद्रित असतांना,
असतांना नभ नक्षत्रांकित
गिरि पद्मासनिं ध्यानावस्थित
चराचराचें मैत्र दाटुनी
सहजच जे प्रार्थनेंत जुळती
सहजच जे प्रार्थनेंत स्फुरती !
जे चिरजागृत, जे करुणामय
जे मृत्युंजय, जे अमृतमय
आशीर्वादच मूर्तिमंत जे
उरले जे उपकारापुरते
हात हवे मज असले मंगल
पवित्र सुंदर !

मुंबई
१३–१०–५१

# कधीं पाहतों

कधीं पाहतों
मी माझ्यांतच विचित्र मानव
क्षुद्र अविकसित विद्रुप दानव
अंधारांतुन अन् चिखलांतुन
वृक्षमुळांपरि भूविवरांतुन
चेटकिणीच्या हातांपरि निज शरीर अपुलें
क्षुद्र घृणास्पद; फिरे परंतु
मिरवित मिरवित जीवनजंतु
अंधपणांतच सरपटणारा
कुढ्या तमांतच अन् जगणारा
विचित्र मानव !

कधीं पाहतों
मी माझ्यांतच विराट मानव
पावलांतुनी उमले ज्याच्या उषाच अभिनव !
हिमालयापरि देह जयाचा
मुकुट शिरावर रविकिरणांचा
पवित्र गंगा स्फुरते ज्याच्या वक्षामधुनी
अन् मृत्युंजय मंत्र जयाच्या अधरांमधुनी !
आकाशाला भिडे जयाचा प्रचंड माथा
हसत उलटतो नक्षत्रांचा प्रकाशगाथा
अमर्त्यतेच्या वाटेवरला जीवनयात्री
रवि भाळावर, अमृत गात्रीं

चिरसंजीवन मंगल नेत्रीं !

विद्रुप मीही, विराट मीही
साक्षी केवळ आणिक तरिही
या दोघांचा :
भूविवरांतिल अंधाराचा; आकाशाचा !

मुंबई
१-११-५१

# धुक्यांत आम्ही कोरित बसतों

धुक्यांत आम्ही कोरित बसतों
गुपित मनांतिल थरथरणारें;
विणीत बसतों लाटांमधले
प्रतिबिंबांचे गूढ इषारे!

द्रवबिंदूंतिल हळवें स्पंदन
जाणिवेंत कधिं टिपून घेतों;
गडद निराकाराची किमया
कधिं शब्दांतुन फुलवित बसतों!

तें स्फुरणारें थरथरणारें
द्रवबिंदूंतुन, इंद्रधनूंतुन,
गहन निशेंतुन, नक्षत्रांतुन,
भाद्रपदांतिल रंगधनांतुन!

...जाणिवेंतलें जाणिवेंत पण...
शब्दांतुन प्रतिबिंबच उरतें
उरिं सूर्याचे बिंब धरुनिया
जलवंती नित मनांत झुरते

गुपित अनिर्वच निःशब्दाचें
शब्दांच्या सीमेवरलें तें
जाणवतें पण हाय! मिळेना...
असून हातीं अतीत उरतें!

तरीहि बसतों धुक्यांत कोरित,
गूढ रेखितों लाटांमधुनी
खोदित वसतों मौनावरतीं
शब्दांचीं, प्रतिमांचीं लेणीं!

पुणें
६–११–५१

# विस्मरणाचें दान तुझें तें

विस्मरणाचें दान तुझें तें सरलें आज
आठवणींचा घेउनि आलिस सुंदर साज

तसलें कांहीं तेव्हांचें तें
मनीं न माझ्या भलतेंसलतें
उरीं न कटुता शल्यहि कांहीं नुरलें आज
आठवणींचा घेउनि आलिस सुंदर साज

कुठें बोलणें? हसलिस नाहीं
घडलेंच जणूं नव्हतें कांहीं
पाळिलास नच साधाही तूं रीतिरिवाज
आठवणींचा घेउन आलिस सुंदर साज

असून ओळख अनोळखी तूं
असून उत्सुक अनुत्सुकहि तूं
हसली का मग जिवणींतुनि सोनेरी लाज
आठवणींचा घेउनि आलिस सुंदर साज

लकब तुझी ही कांहिं निराळी
शब्दांवर मौनाची जाळी
विरक्तींत शिशिराच्या दडला पण ऋतुराज
आठवणींचा घेउनि आलिस सुंदर साज

तृप्त गडे मी व्यथा कोठुनी ?
मोहरलें पण मौन स्वरांनीं
चांदण्यांत जरि यमुनाकांठीं हसला ताज
आठवणींचा घेउनि आलिस सुंदर साज !

मुंबई
११-११-५१

# तूं असतिस तर

तूं असतिस तर झालें असतें
गडे उन्हाचें गोड चांदणें
मोहरलें असतें मौनांतुन
एक दिवाणें नवथर गाणें !

बकुळीच्या पुष्पांपरि नाजुक
फुलले असते गंधानें क्षण,
अन् रंगांनीं भरलें असतें
क्षितिजावरचें खिन्न रितेपण

पसरियली असती छायांनीं
चरणतळीं मृदु शामल मखमल
अन् शुक्रानें केलें असतें
स्वागत अपुलें हसून मिस्किल

तूं असतिस तर झालें असतें
आहे त्याहुनि जग हें सुंदर
चांदण्यांत विरघळलें असतें
गगनधरेंतिल धूसर अंतर

मुंबई
२२-११-५१

# तुझी निराळीच तऱ्हा

विजेपरी चमकून
तूं न जिंकलेंस मन
दिपवून भुलवून

लाटांपरी भरतीच्या
बुडविलेंस न कधीं
मत्त वेगांत प्रीतीच्या

नाहीं तुझ्या बोलण्यांत
धुंद पुनवेची रात,
चांदण्याची बरसात

नित्य नवा आविष्कार
फुलविलास न कधीं
ज्यांत शब्दांचा शृंगार

सांगितलेंस गुपित
पहाटेच्या दवापरी
हळु तृणाच्या कानांत

कळीपरी नकळत
पानाआड दडूनच
फुललीस अवचित

गाढ एकांताच्या मनीं
शहारलीस होऊन
स्निग्ध लाजरी चांदणी

दाविलीस लोचनांत
एक नवीनच वाट,
एक नवीन पहाट

विजेपरी चमकून
तूं न जिंकलेंस मन
दिपवून भुलवून

तुझी निराळीच तऱ्हा
तुझ्या अबोलपणांत
गडे अमृताचा झरा!

पुणें
२९-१२-५१

# क्षणांत असल्या

असे भिडावे
नकळत क्षणभर अपुले डोळे
उमलुन यावें
हृदयांतिल हितगूज मोकळें

असाच व्हावा
स्पर्श कधीं नवथर ओझरता
अन् उमगावें
जें शब्दांना ये न दावितां

तूं उधळावें
पाकळयांतलें निर्मळ मार्दव
सदाफुलीपरि
सदा तुझें फुलणारें लाघव

तुझी गूढता
मध्यरात्रिच्या आकाशापरि
पटवित ओळख
पसरत यावी स्निग्ध अंतरीं

ठाउक मजला
वाटहि कधितरि तमांत बुजते
झुळझुळणारें
गीत अधरिंचें अवचित थिजतें

कुणीं करावी
गहन उद्यांची खंत आज पण ?
क्षणांत असल्या
शाश्वतिचें जर नवें निमंत्रण !

जाणिवेंत तूं
चमक होउनी गडे चांदणी
अशीच अविरत
शुभ्र क्षणांची करित सांडणी !

मुंबई
१९५१

# ही उदास संध्याकाळ

ही उदास संध्याकाळ
खिन्नपणा पांघरून बसला झुरत दूरचा माळ !

असुनीही नसल्यासम पानें
थिजलें त्यांच्या मनिंचें गाणें
फिकट पांढरी चंद्रकोर उरिं जपत बसे आभाळ
ही उदास संध्याकाळ !

संथ तरंगत मेघ एकला
नकळे शोधित काय चालला
अंधाराचें करित ध्यान जणुं पर्वत भव्य विशाळ
ही उदास संध्याकाळ !

मनीं अकारण कळवळलें जळ
कसली तळमळ ? कशास विव्हळ ?
करीत सळसळ व्याकुळ पिंपळ आठवितो गतकाळ
ही उदास संध्याकाळ !

ही वाऱ्याची झुळुक लाजरी
अकालींच जणुं प्रौढ जाहली
तिलाच नकळत तिच्या अधरिंचें विरलें हास्य खट्याळ
ही उदास संध्याकाळ !

अंधाराची शामल चाहुल
जळांत भिनली ढाळित काजळ
विकट सावल्यांतुन हो जागृत भयभीषण वेताळ
ही उदास संध्याकाळ!

उरल्यासुरल्या प्रकाशकणिका
खिरल्या काळोखांतच देखा
दूर कुठेंसा परंतु दिसतो लाल केशरी जाळ!
ही उदास संध्याकाळ!

पुणें
२-१-५२

# व्यथा

तुज कधींच नाहीं कळलें, नाहीं कळलें
मी तुझ्याचसाठीं किती किती तळमळलें !

पण कसें कळावें ? तेव्हां अभिमानानें
भांडलें, तंडलें, फणफणलें क्रोधानें
काटेरी उधळुनि शब्द परतलें मागें
तें घडलें सारें...सारें अंधपणानें !

पण खरेंच नव्हतें तसलें कांहि मनांत
जें होउनि अग्नी धगधगलें शब्दांत
जातांना भिडली नजर तुझ्या नजरेला
मीं व्यथा पाहिली भिजलेली तेजांत !

का खरीच होती माझी तुजवर प्रीत ?
कां अशी वागलें ? कुठली असली रीत ?
अपुल्याशीं केलें मींच समर्थन माझें
अन् म्हटलें जुळविन पुन्हा नवीनच गीत

त्या गीताचे पण सूर कधींच न जुळले
मी ज्योत व्यथेची होउनि जळलें, जळलें
मीं म्हटलें विसरुनि जाइन सारें सारें
तुज सांगुं कसें रे मलाच मीं किति छळलें !

वाटलें कितिकदां पुन्हा तुजकडे यावें
अन् मिठींत तुझिया माझेपण विसरावें
वाटलें कितिकदां मिटून अलगद डोळे
रे तुझ्या प्रीतिच्या आवेगांत बुडावें!

ओसरला अवचित कलह मनांतिल सारा
अन् विरला क्षणिं त्या अभिमानाचा पारा
उगवला मनाच्या निर्मळ क्षितिजावरतीं
कोवळी शुभ्रता शिंपित हसरा तारा!

मी तशीच उठलें...होता जरि अंधार...
काढियला अडसर आणि उघडिलें दार
का फसविति डोळे? तूंच उभा दाराशीं...
मी कोसळलें...घेऊन तुझा आधार!

शिर खुपसुनि वक्षीं स्फुंदुनि स्फुंदुनि रडलें,
मी वादळांतल्या फुलापरी थरथरलें
'या चरणांपाशीं मींच निघालें होतें—'
वाटलें म्हणावें—परंतु शब्द न फुटले!

ही व्यथा मनींची मौनांतच सांकळली
का असेल तुजला अश्रूंतुन आकळली?
मी नाहिं बोललें...नाहिं जाहला धीर...
वेदना उरींची उरींच रे कळवळली!

अजुनीहि तरी कधिं एकांतीं तळमळतें
तळमळतें, जळतें आणि स्वतांशीं म्हणतें :
तुज कधींच नाहीं कळलें, नाहीं कळलें
माझेपण विसरुन किती किती तळमळलें

पुणें
१९५२

# क्षणपुष्पांच्या सरी

चिंतनीं उभ्या तरूंच्या तळीं
गुंफिली छायांनीं साखळी
पालवी सळसळली मोकळी
चांदणें हळुच मिसळलें जळीं

उडाला तरळत हळु काजवा
हवेंतुन शिरशिरला गारवा
उसासा गंधित टाकुनि असा
कुजबुजे वारा गंधर्वसा !

दिशांची तरल पापणी मिटे
संथ जळ पुलकफुलांनीं नटे
विरहिणी रमणीपरि नच कळे
मेघ कां आतुर होउनि वळे ?

डवरला काळ पारिजातसा
क्षणांच्या शुभ्र फुलांनीं असा
अमल ही नीरवता अंतरीं
साठवी क्षणपुष्पांच्या सरी !

मुंबई
१९५२

# निर्मिति

कळलें ज्या क्षणिं अंधाराला
नक्षत्रांशीं अपुलें नातें
ज्या क्षणिं भेदुनि भूमीचा थर
रुजून आलें हिरवें पातें !

लवुनि घेतलें आषाढानें
ज्या क्षणिं या मातीचें चुंबन
विसरुन मीपण आकाशानें
दिलें धरेला दृढ आलिंगन !

त्याच क्षणीं मी अमर जाहलों
लंघुनिया मरणाचें कुंपण
मरण विरघळे अमरपणांतच
उमले जेव्हां सृजनाचा क्षण !

गळला घुंगटपट काळाचा
प्रियकर होउन आलें जीवन
दिक्कालाच्या अतीत झालें
या प्राणांचें अमृतमीलन !

त्या क्षणिं या आकृतिचें वंधन
मलाच माझें नकळत गळलें
विदेहीच त्या क्षणीं परंतू
आकाराचें रहस्य कळलें !

रहस्य कळलें अंधाराला
कळलें नक्षत्रांशीं नातें
अन् मी भेदुनि भूमीचा थर
रुजलों होउनि हिरवें पातें

मुंबई
१४-१-५२

# कधीं एकदां

कधीं एकदां
अनंत अथांग आकाशाखालीं
उत्तर दक्षिण गिरकी घेऊन
वाहत भरारा म्हणाला वारा :
जीर्ण विचारांचीं, जीर्ण संकेतांचीं
वाहून नेऊन सुकलीं पानें
निर्मळ मोकळीं करितों रानें

तोंच खळाळत, धुंद उसळत
नदी धावली आणि म्हणाली :
लोकमाता मी
लोकसेवेचें माझें हें व्रत
जातें मी वाहत आणि फुलवीत
काठाकाठांनी
दोन्ही हातांनीं
फुलांची, फळांची समृद्ध सृष्टी
स्पर्शांत माझिया अमृतवृष्टी

तोंच कडाडत, गर्जत गर्जत
वदली त्वेषांत जळत विद्युत :
मूर्तिभंजक मी जागृत तर्मी
करून प्रहार
भेदितें अंधार

माझीच शक्ति
देतसे मुक्ति
जीर्ण आकारांस ! जीर्ण प्रतिमांस !

बाजूस कोठें लपून होतें
हिरव्या तृणांत फूल इवलें
उभें एकलें !
वनपरीचें स्वप्नच जणुं
तिच्या नकळत मागें राहिलें
आणि उमललें !
इंद्रधनुष्यच अथवा लाजरें
भूमीला स्फुरलें !
रंगांच्या कोवळ्या
जाहल्या पाकळ्या !
ऐकून नदीचे वायूचे शब्द
निश्चल निःशब्द फूल इवलें
उभें राहिलें !
तयास वाटलें कांहीं बोलावें
हृद्गत आपुलें आणि सांगावें
अधीर लाजऱ्या अधरामधून
फुटेना शब्द,
फूल इवलें शांत निःशब्द !
तयाचें हृद्गत ऐकण्यासाठीं
थांबला जरा खट्याळ वारा
थांबली बिजली, नदीही थांबली
आतुर दिशाही जाहल्या दाही !
थरथरल्या तोंच पाकळ्या

साठविलेलें सारें मनांतलें
उचंबळलें
अनंत अथांग आकाशाखालीं
गंधित मौनास इवल्या फुलाच्या
फुटला अंकुर कोवळ्या स्वराचा
सारे साठवून
सारे आठवून
फूल म्हणाले :
" उमलतें मी...उमलतें मी. "

मुंबई
१२–३–५२

# शांत किनारा

स्निग्ध पहाटे
कोवळें आकाश लाटांत दाटे,
दूरांत अंधुक चमके तारा
शांत किनारा !

अबोध शांति
हलके ठिबके केशर कांति,
लहरी चुंबीत लहरे वारा
शांत किनारा !

कापरें पाणी
सुरूच्या बनांत धूसर गाणीं
आतुर आकाशवीणेच्या तारा
शांत किनारा !

अथांग सारें
आकाश सागर डोंगर वारे
लोकरी ढगांत आनंदधारा
शांत किनारा !

मुंबई
१९५२

# किमया

उभारून कर उभे माड हे
शिरिं वीरापरि झेलित वृष्टी
जरा पहावें क्षितिजावर तर
बुडून जाते धुक्यांत दृष्टी

हिरवीं झाडें...शामल डोंगर
धूसर निळसर तलम हवा ही
लाल गढूळ जळांतुन वाहे
उसळत खिदळत चंचल कांहीं

भिजून गेले पंख तरीही
बसला तारांवरतीं पक्षी
मधेंच ठिबके थेंब कोवळा
फुलवित जाळिं वलयांची नक्षी

मिचकावित केशरी पापणी
कुठें दूरच्या ज्योती हसती
कुठें घरांच्या कौलारांवर
गुच्छ धुराचे झुलती...भिजती

छेडि सुरावट मल्हाराची
धारांच्या तारांवर वारा
लख्ख विजेच्या प्रतिबिंबाचा
जळांत गोठुनि झाला पारा

ध्वज मिरवित काजळी धुराचा
आगगाडि ये दुरून उत्सुक
खडखड धडधड आज तिची पण
भिजून झाली हळवी नाजुक !

काकावाडी : वर्धा
२३–६–५२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
७४४२१ दि. ११/३/७९
११९६
१६७०५

# सत्कार

पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

उरिं जेव्हां ज्वालारस झेलुन
धरतीनें तप केलें दारुण
सुकतां सुकतां नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

त्या काळीं धरणीच्या पोटीं
या इवल्या बीजाच्या ओठीं
थरथरली स्फुरली होती हो श्रद्धेची ललकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

कवच भूमिचें आणि अचानक
भेदुनि आलें हिरवें कौतुक
नचिकेताचें स्वप्नच अथवा अवचित हो साकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

मातीची ही मात मृत्युवर
मृत्युंजय श्रद्धेचा अंकुर
हा सृजनांचा विजयध्वज, हा जीवनसाक्षात्कार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

म्हटलें स्वागतगीत खगांनीं
केला मुजरा लवुन द्रुगांनीं
लाल मातिचा गुलाल उधळित पवन करी संचार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

कोसळली सर दक्षिण उत्तर
घमघमलें मातींतुनि अत्तर
अष्टदिशांतुन अभीष्टचिंतन, घुमला जयजयकार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार

काकावाडी–वर्धा
२८–६–५२

# पांघरूण

त्या रात्रीं
तो आला घेउनि अपुल्या नेत्रीं, गात्रीं
वासना आंधळी;
तो स्पर्श वादळी, तो धुंद श्वास
अन् शिरांशिरांतुन थडथडणारा तो विलास.
क्रोधानें संतापानें मीं धगधगलें
आणि म्हणालें :
" ही प्रीती
कसली प्रीती ?
मिरवीत मुलामा शब्दांचा सोनेरी
ही लालसाच मायावी झगमगणारी ! "

त्या क्षणिं मीं त्याला
निर्दय होउनि दूर लोटिलें
मी खड्ग होउनी ज्वालेचें लखलखलें
तळपलें आणि त्या तेजांतच पाहियलें
मुख त्याचें लज्जित, अपमानित, लांछित,
अस्तित्वच त्याचें
जणुं गेलें खिरुनी
त्याच्याच भंवतिंच्या
आणि हृदयिंच्या
अपमानित लज्जित नीरवतेंतच !

अवचित जेव्हां जाग पहाटे आली
अन् गार चावरी झुळुक वायुची
येउनि भिडली!
मी शहारलें, थरथरलें;
मीं सहज पाहिलें आश्चर्यानें...
अन् पुन्हा पाहिलें आश्चर्यानें...
पांघरूण त्याचें होतें माझ्या अंगावरतीं!
दुमडून पाय पोटाशीं
तो तसाच होता निद्रित...स्वप्नांकित!

मी तशीच उठलें
अन् कसल्या तरि गूढ समाधिंत मिटून डोळे
बाहेर येउनी ओटीवर क्षण उभी राहिलें!
मोगरा बहरला होता लाख फुलांनीं
जणुं गंधित नक्षत्रांनीं!!
अंधार सुगंधित होउनि
थरथरत...शहारत होता—
मनापरी जणुं माझ्या!!

काकावाडी-वर्धा
२४-७ ५२

# निवांत

कोवळ्या पाण्याचा लख्ख आरसा
त्यांत डोकावे शुभ्र ढगाचा गुलजार ससा !

सळसळत हा पळस उभा
दूर न्याहळी देवालयाचा कळस नभा !

लवचिक सर झडून गेली
भिजल्या पानीं शीळ वाऱ्याची जाहली ओली !

पाउलवाटेला लाडिक घाई
लाल वळसा घेऊन असा पुढेंच जाई !

शालीन कौलांचीं कुलीन घरें
आतिथ्यशील कुणाची वाट पाहती बरें ?

आकाश हसरें फेनिलकांत
पाहत जळीं एकला बसे स्निग्ध निवांत !

काकावाडी-वर्धा
२९–७–५२

## रात्र भिजली....

रात्र भिजली,
कांपऱ्या तंद्रींत
पानें निजलीं.

काजवा उडे
एकला झुरत
मालवे...बुडे.

निथळे हळू
मधेंच एखादा
थेंब लाजाळू.

दाट सावल्या
पागल...मंथर
भारावलेल्या !

जमीन काळी
मातला अंधार
घट्ट कवळी...

काकावाडी–वर्धा
८–८–५२

# जय जय हे पार्थिवते !

हे पार्थिवते,
त्या ब्रह्माची केली पूजा ज्यांनीं
तुच्छ लेखिलें त्यांनीं तुजला
जाणिव नव्हती त्यांना तुझिया अस्तित्वाची,
ब्रह्म सत्य अन् मिथ्या जग हें सारें—
हीच धारणा होती त्यांची;
ब्रह्म सत्य... !
अन् असत्य होती माती,
असत्य होतें कूस तिची भेदुनिया वर येणारें
लसलसणारें हिरवें पातें,
असत्य होते रंग गंध रस,
असत्य शोभा संध्येची, सौंदर्य उषेचें...
ब्रह्म सत्य अन् मिथ्या जग हें सारें !
हे पार्थिवते,
जाणिव नव्हती त्यांना तुझिया अस्तित्वाची !!

हे पार्थिवते,
ही सृष्टी होती गात सदोदित
यशगान तुझें, जयगान तुझें—
फुलांफुलांतुन, तृणांतृणांतुन
मंथर आतुर जललहरींतुन
कधीं भव्य पाषाणांतुन अन्
कधिं झुळझुळत्या हंसशुभ्र शुभ निर्झरणींतुन:
तुझी प्रतिष्ठा वज्रबलानें सम्राटापरि होती गर्जत
गिरसप्पाच्या उद्घोषांतुन !

तारुण्य तुझें, कारुण्य तुझें होतें वाहत
गंगेमधुनी, यमुनेमधुनी
करीत सुफलित कणकण या मातीचा !
आषाढाच्या धारांतुनि तूं बरसत होतिस,
गच्च वाढल्या पिकांतुनी तूं डोलत होतिस, बोलत होतिस,
तूं चुंबित होतिस धार विळ्याची,
आलिंगित होतिस नांगर अन् फिरणारा.
हे पार्थिवते,
ही सृष्टी होती गात सदोदित
यशगान तुझें, जयगान तुझें !

हंत ! परंतू त्यांना दिसलें नाहीं
सत्य तुझ्यांतिल जगवित जग जगणारें.
दिसलें त्यांना मिथ्या जग हें सारें :
ते शोधुं लागले ब्रह्म अपार्थिव
दुर्लक्षुनि ही माती
अव्हेरुनि ही माती.
आकाराला तुच्छ लेखिलें त्यांनीं,
तुच्छ लेखिलें त्यांनीं अवघें
रंगाचें जग, गंधांचें जग
फुलणारें झुलणारें सुंदर पुष्पांचें जग
शीळ वाजवित उडणाऱ्या त्या पक्ष्यांचें जग,
ऋचा भव्यतेची गाणाऱ्या शिखरांचें जग,
उर्वशिच्या चिरतारुण्यापरि—
अविरत झुळझुळणारें सुंदर सरितांचें जग.
हे चिरसुंदर पार्थिवते तुज अव्हेरियलें त्यांनीं;

परित्यक्त मेनकेपरी तूं उभी राहिलिस
ऐश्वर्याचें सौंदर्याचें शाकुंतल घेउनिया हातीं,
हाय परंतू ! मिटून डोळे ( आणि हृदयहि ! )
अव्हेरियलें त्यांनीं ' मिथ्या जग ' हें :
ते शोधुं लागले ब्रह्म अपार्थिव
दुर्लक्षुनि ही माती, अव्हेरुनि ही माती !

हे पार्थिवते !
केला त्यांनीं अव्हेर तुझा...
आणिक आलें दैन्यच्च अंतीं भाळीं :
षड्रस झाले रुष्ट...भूमि अश्रद्ध मनापरि वंध्या झाली
अज्ञातानें गिळिलें सोनें पृथ्वीच्या उदरींचें
लुप्त जाहलीं रत्नें आणिक नावाचा उरला रत्नाकर
करिं नांगर धरणाऱ्यांच्या उरिं नुरली श्रद्धा
गंजुनि गेले फाळ, गंजले विळे-कोयते.
हंत ! तक्षकानें घर केलें उरीं फळांच्या—
ऐश्वर्याच्या परिक्षिताला दंशण्यास कडकडुनी.
हे पार्थिवते !
लुप्त जाहली ऐश्वर्याची प्रभा तुझ्या...
अन् गंजुनि प्राक्तन
उरलें केवळ विकल अंतरीं धुकेंच त्या ब्रह्माचें !
आसक्तीनें पोखरलेले प्राण...परंतु
अधरांवरतीं होतें ध्रुवपद :
" ब्रह्म सत्य अन् मिथ्या जग हें सारें !
आणिक आतां रित्या मनांतुन,
रिक्त गाडग्यांतुन, मडक्यांतुन
ब्रह्म ? कोठलें ब्रह्म ? दुःख-दारिद्र्यच उरलें !

हे पार्थिवते !
कळलें आतां नाहिं तुझ्याविण ब्रह्म वेगळें:
असतें का कधि स्मित अधरांविण ?
गंध फुलांविण ? जल वर्षेविण ?
कळतें आतां ब्रह्म तुझ्यांतुन
बीजामधुनी वर येणाऱ्या वृक्षापरि नित विकसत असतें;
कळतें आतां—
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणूनच ब्रह्म सत्य,
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणुनि सौंदर्य सत्य,
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणूनच रंग-गंध-रस-रूप सत्य,
तूं आकारसत्य अन् निराकार व्यक्तित्व तुझें
हे पार्थिवते ! तूं सत्य म्हणूनच ब्रह्म सत्य !

जय जय हे पार्थिवते,
जय जय हे वृक्षांतिल, पक्षांतिल पार्थिवते,
जय जय हे मातींतिल, मूर्तींतिल पार्थिवते,
जय जय हे अन्नांतिल, वस्त्रांतिल पार्थिवते
जय जय हे रंग-गंध-नादमयी, जय जय आकारमयी,
जय जय कारुण्यमयी, जय जय तारुण्यमयी;
ब्रह्म तुझ्या गर्भांतच वाढतसे
विकसतसे...विकसतसे...
जय जय हे पार्थिवते !
जय जय हे पार्थिवते !

काकावाडी—वर्धा
९-८-७२

# अजून व्हायची जरी पहाट

अजून व्हायची आहे पहाट
अजूनहि सारीं झाडें अंधारांत झाकलेली
निद्रेंत ही नीरवता ओथंबून वाकलेली
अंधुक दिसते पाउलवाट
अजून व्हायची आहे पहाट !

उमलली आहे-नाहीं शुभ्र ' स्वस्तिका 'ची कळी
क्षितिजाच्या मनांतली उठली न सोनसळी
प्रशांत दिशांत अंधार दाट
अजून व्हायची आहे पहाट

अस्पष्टाच्या सीमेवर अंधुक डोंगर दिसे
अशा अंधाराच्या वेळीं वास्तव आभास भासे
वेढी काळोखाचें शून्य विराट
अजून व्हायची आहे पहाट

पण जाणिवेची गळे कशी तमाची ओढणी ?
उरीं उघडली कशी प्रकाशानें ही पापणी ?
आंतल्या प्रकाशीं नाहली रात
अजून व्हायची आहे पहाट !

आंत·बाहेर हें आतां अंतर उरावें कसें ?
शब्द फसवेच सारे नित्य फसविती असे
गळून पडला अंतर-पाट
अजून व्हायची जरी पहाट !

काकावाडी-वर्धा
१२-८-५२

# माझे पंख मागूं नको

माग हवें तें गडे तूं
माझे पंख मागूं नको !

रेशमी ही झुळझुळ धुंद निर्झराच्या काठीं
इथें मखमली एकांत तुझ्यासाठीं तुझ्यासाठीं
जरी तुझाच निर्झर...
त्याची गती मागूं नको
माझे पंख मागूं नको

वांधी श्रावण झालर धारा झरती, झरती
इंद्रधनुष्य स्वरांचें नाचे अधरांवरतीं
गीत तुझें; गावयाचें—
माझें वेड मागूं नको
माझे पंख मागूं नको !

तुझ्या आलिंगनांतच जग विसरून जावें
मत्त निशिगंधापरी मिठींतच उमलावें
सुगंधाच्यासाठीं पण
विकास तूं मागूं नको
माझे पंख मागूं नको

माझें दूरचें क्षितिज तुझ्या नेत्रीं बुडलेलें;
पापण्यांत—बांधणारें—एक स्वप्न दडलेलें
दान स्वप्नाचें देऊन
जाग माझी मागूं नको
माग हवें तें गडे तूं
माझे पंख मागूं नको !

काकावाडी : वर्धा
१४–८–५२

# दर्शन

मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

होत्या लाटा उधळित अपुली फेनिल कविता
फुलांफुलांतुन अखंड उमलत होती नवता
होते वारे वाहत, तारे होते चमकत
वाभळिवरही गुच्छ फुलांचे होते लगडत
रे कसें वेगळें म्हणूं सांग तुज यांच्यापासुन ?
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

उठुनि पहाटे जावें तर तूं रंगच व्हावें
नभीं पहावें तर तूं ढग होऊन झुलावें
या धारांतुन तुझे कृपामय हात दिसावे
किरणांच्या अधरांवर स्मित तव फुलत असावें
हें डोळे भरुनी बघतों आहें सारें अनुदिन
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

तूं नाहिंस ? या वसंतांतुनी कोण फुले मग ?
तूं नाहिंस ? दवबिंदुंत कां मग झगमग झगमग ?
तुझ्यावाचुनी बीजांमधुनी कोण फुले रे ?
तुझ्यावाचुनी रंगांमधुनी कोण खुले रे ?
मीं कधिं न पाहिलें तुझें निराळेपण त्यांच्याविण
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

हेलावे जनसागर माझ्या अवतींभवतीं
खरें सांग, हीं नाना रूपें तुझींच नव्हतीं ?
मनामनांतुन त्यांच्या होती तुझी चेतना
कर्माकर्मामधून होती तुझी प्रेरणा !
मीं कसें उणें तुज करूं त्यांचिया सुखदुःखांतुन ?
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

तुला पाहिलें ऋतूऋतूंतुन; फुलाफळांतुन,
त्या गगनांतुन, या मातींतुन, स्थितीगतींतुन,
संघर्षांतुन, सुखदुःखांतुन, व्यथेव्यथेंतुन
या सृष्टींतुन, अन् भवतींच्या मानवतेंतुन
रे कसें शोधुं तुज वेड्यापरि मी तुलाच टाकुन ?
मीं कधींच नाहीं म्हटलें कीं तूं दे मज दर्शन

काकावाडी : वर्धा
१८-८-५२

# आज जागें आहे मन

अणूंत अणूंत, परमाणूंत हवेच्या
आहेस तूं!
रोमारोमांत भूमीच्या, कोंबाकोंबांत बीजाच्या
आहेस तूं!
तुझ्या स्वागतार्थ पण
जागें हवें माझें मन...जागें हवें माझें मन!

पंख पालवीत, शीळ वाजवीत, लपत उडतें
कोण सकाळच्या पारीं?
कापराच्या ज्योतीपरी कोण जळतें दुपारीं?
पानें सुकून, पिकून
खालीं पडतांना कोण घेतसे नाजुक सोनेरी गिरकी?
लाटा ओढाळ मस्तींत फुटतां फुटतां
कोण मधेंच घेतसे लोळण...फिरकी?
तुझ्या अस्तित्वाची जादू
साऱ्या सृष्टींत भरून आहेस तूं!
अणूंत अणूंत, परमाणूंत हवेच्या आहेस तूं?

पानांच्या मनांत
कोण लाडिक स्वरांत वाजवी सनई?
खालीं भूमीवर कोण
हलक्या हातानें दाट तमाची दुलई?
दवांत नटतें कुणाचें...कुणाचें...रत्नजडित गुपित?
निबिड वनास कोण भिववी करून अंध उन्मत्त गर्जित?

कोण वसंतांत फुले ? शिशिरांत झुरे ? वर्षेत पाझरे ?
तुरे फेनाचे माळून कोण लाटांवर फिरे ?
कोण हलके रंगवी मेंदीच्या पानाचें इवलेंसें मन ?
तुझें नाहीं तर कुणाचें स्मित हा चोरितो श्रावण ?
सौंदर्य-घना रे ! तुझ्या वर्षावांत...लावण्यजळांत
सारें भिजवीत आहेस तूं !
अणूंत अणूंत, परमाणूंत हवेच्या आहेस तूं !

अरे विराटा ! तुझें हृदय आकाश
तुझा देह अवकाश !
तुझी गती, तुझी गती...वाहत्या वाऱ्यांत, धावत्या पाण्यांत,
तेज तुझें, तेज तुझें...जळत्या अग्नींत...धगधगत्या सूर्यांत,
तुझें गांभीर्य दर्यांत,
तुझी चाल, तुझी चाल...चंचल...खट्याळ...डुडकी
खळखळत्या झऱ्यांत,
तुझा विराट संकल्प उभा पर्वतांत,
तुझें विकासाचें स्वप्न
वाढताहे...वाढताहे मानवाच्या हृदयांतः
एक कण असा नाहीं जिथें नाहींस तूं जिथें नाहींस तूं,
निकट निकट...दूर, इकडे तिकडे...
अलिकडे...पलिकडे...
दिशांत...दिशांत,
पाताळांत, आकाशांत
भूमीच्या गर्भांत, नभाच्या नाभींत,
घुमत मनांत...स्पंदत प्राणांत आहेस तूं.
अरे, तुझ्या स्वागतार्थ आज जागें आहे मन !

जशी तार सतारीची जागृत आतुर
कलाकाराचिया उत्स्फूर्त स्पर्शाच्यासाठीं...
फिरूं दे, फिरूं दे तुझा हात;
उठूं दे, उठूं दे झंकार झंकार...
अणूंत अणूंत, परमाणूंत हवेच्या आहेस तूं
रोमारोमांत भूमीच्या, कोंवाकोंवांत बीजाच्या आहेस तूं!

काकावाडी : वर्धा
२०–८–५२

# अलगूज

ध्यानींमानिंही नसतां माझ्या
आज भेटलिस अशी अचानक
खरें सांगुं का ?
विसरुनिही मी गेलों होतों
धूसर झाली होती ओळख !

भेटतांच तूं परंतू केला
ओळखल्याचा तुला बहाणा
तुला परंतू कळलें सारें
हें कळलें मज तूं हसतांना

" विसरलांत ना माझी ओळख ?
कशास मग ही फसवाफसवी ?
सांगा माझें नांव बरें मग
सांगा ना ! कां लपवाछपवी ? "

किती धीट तूं
क्षणभर लाजुनि बावरलों मी
शब्दहि अडले अधरांवरतीं
हारच ही माझी नव्हती का ?
घडली होती तुझी विस्मृती !

किती बोललों आपण नंतर
स्वच्छ मोकळें शुभ्र झऱ्यापरि
नसतां कारण उगीच हसलों
उगीच फुललों आणि फुलांपरि

जुन्या स्मृती क्षण नवीन झाल्या :
तें विद्यालय...गडबड...गोंधळ
त्या सहली...संमेलन...चर्चा
जग तें सारें जिवंत अवखळ

चालत होतों रस्त्यावरुनी
हासत खिदळत बोलत आपण
प्रौढपणाचें ओझें नव्हतें
नव्हतें उपचारांचें बंधन

रस्त्यावरतीं वाटहि नव्हती
गर्दीचें गजबजतें जीवन
त्यांच्या मध्यें असून आपण
निराळेच होतों त्यांच्याहुन

चिडुनि म्हणालिस, " नको वाटतें
शहरामधलें असलें जीवन
ही गर्दी, ही धांदल, गडवड
अन् यंत्रापरि झालेलें मन

दूर कुठें तरि वाटे जावें
आणि जगावें माणुस म्हणुनी
जिथें जाणवे वसंत...वर्षा
जिथें शृंखला नसती चरणीं!"

अभिमानानें आणि म्हणालिस—
"तुमच्या कविता वाचित असतें..."
नवीन झाले तुझिया अधरीं
जुनेच माझे आणि शब्द ते!

निरोप अन् घेतांना कळलें
वाट आपुली होती सरली,
नव्हती हुरहुर : आनंदाची
लकेर डोळ्यांतुनि थरथरली!

मी तंद्रींतच घरांत आलों
माझें अलगुज आणि शोधिलें
कितीक वर्षे निःशब्दच जें
धुळींत माखुनि होतें पडलें!

पुन्हा किती तरि वर्षांनीं मीं
सूर छेडिले त्याच्यावरतीं
श्वासांचें होउनियां गाणें
झुलूं लागलें तिमिरावरतीं!

मुंबई
२८–८–५२

# अशा वेळीं

होतें संथ शांत पाणी
पानें नव्हतीं बोलत
मंत्रमुग्ध खिळलेले
माड नव्हते डोलत

कोठें एखादा दुसरा
होता आकाशांत ढग
आणि अंधुकली होती
पाण्यांतली झगमग

पंख मिटून पारवा
तसें निःशब्द आकाश
आणि आठवणींपरी
आर्त अंधुक प्रकाश

अशा वेळींच बोलतें
कधीं नाहीं जें बोलत
अशा वेळीं आकळतें
कधीं नाहीं जें कळत

काजळाच्या कोषांतून
उडे पांखरूं तेजाचें
अशा वेळीं काळोखाला
येती कोंब नक्षत्रांचे

अशा वेळीं जागी होते
तार गाढ निजलेली
अशा वेळीं पेट घेते
आणि आग विझलेली

मुंबई
२८-८-५२

# जवळपणाचें झालें बंधन

इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

छेडणार जर होतों आपण गीत नवें तर
हवेंच होतें वीणेच्या तारांतुन अंतर
धुंदपणीं त्या...अंधपणीं त्या भान राहिलें नाहीं हें पण
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

मोहफुलांपरि तेव्हांचे ते क्षण दरवळले
गंधित उन्मद त्या अंधारीं कांहिं न कळलें
नव्हती जाणिव होइल म्हणुनी शृंखलाच हें मधु आलिंगन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

भरुनि राहिलीस तूंच माझिया नेत्रांमधुनी
निद्रेमधुनी, स्वप्नामधुनी, जागृतींतुनी,
कळलें आतां असून डोळे नव्हती दृष्टी नव्हतें दर्शन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

गुंफियलेले कर हे झाले पहा साखळ्या,
मीलन कसलें ? जें न बघूं दे दिशा मोकळ्या
खोल उरीं कुणि तडफडलें; पण जाणवलें नच तें आक्रंदन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

निकट असुनिही श्वासापुरतें दूर असावें
जवळपणांतहि पंखांना आकाश दिसावें
हवें वेगळेपण कांहींतरि मीलनांतही सखि अपल्यांतुन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

जवळ...जवळ ये, पण सीमेचें भान असूं दे
रात्र असो, पण पहाटही वेगळी दिसूं दे
स्वरजुळणींतुनि एक गीत—तरि हवेंच अंतर सात सुरांतुन
इतुके आलों जवळ जवळ कीं जवळपणाचें झालें बंधन

काकावाडी : वर्धा
१-११-५१

# गाणें

विनाश आहे भरून भवतीं
इथें तिथें अन्...
घराघरांतुन, मनामनांतुन;
कुठें भरारी पंखांमधली ?
कुठें उभारी प्राणांमधली ?
पूजियल्या ज्या मूर्ती त्यांचे दगडच झाले,
नव्या जगाचें आश्वासन ?...पण युद्धच आलें;
सुकलेल्या स्वप्नांना झाकित सारे जगती, अन् तगमगती.
वसंतांत पण या झाडांना
येती बघ ना हिरवीं पानें
म्हणुनि तरळतें अजूनही ओठांवर गाणें

खळखळणाऱ्या लाटांवरतीं फेस खिद्ळतो
शुभ्र पांढरा...सूक्ष्म तरल त्यांतील छटा निळसर रंगाची
पश्चिम क्षितिजाच्या भाळावर
रुळे कुरळ बट डौलदार सावळ्या ढगाची,
मिस्किल चंचल पहा सावल्या
शांत झोपल्या धुळीस करिती उगिच गुद्गुल्या,
संथ निळ्या पाण्यामधला तो सुजाण आशय
कंपन कधिं हळुवार तरळतें होउनि त्यावर नाजुक किसलय;
कणाकणांतुन या सृष्टीच्या
नित्य नवे सौंदर्यतराणे
म्हणुनि तरळतें अजूनही ओठांवर गाणें

विनाश आहे भरून भवतीं
तुमच्या अमुच्या जगीं खरें, पण—
तुमच्या अमुच्या जगापलिकडे आहे जीवन...विशाल जीवन
विहरत...खिदळत...नित्य विकासत :
जास्वंदीचीं लाल फुलें तीं
जाइजुईचें कुलीन सुंदर सलज्ज वैभव
झाडें...पक्षी...डोंगर...वारे
नक्षत्रांचे शुभ्र इशारे
फूलहि इवलें या विश्वांतिल
उभें कसें डोलांत पहा ना मरण जिंकुनी
उभा जसा हो कालियाचिया मस्तकावरी पाय ठेवुनी
तो योगेश्वर...तो वन्सीधर
अणुरेणूंतुन या सृष्टीच्या सृजनाचें ऐश्वर्य उधाणे
म्हणुन तरळतें अजूनही ओठांवर गाणें

धंतोली : नागपूर
१३–१–५२

# दुपार एकटी जळे

अलिकडे लपवितों
तुझ्यापासून मी माझी व्यथा
सांगायचें टाळतों मी
आसवांत भिजलेली कथा

तुझ्या भोवतीं घोटाळे
माझ्या मनच्या फुलांचा वास
तुझ्या दृष्टीपलीकडे
निर्माल्याची पण जमे रास

दुःखीं जीवन कळावें
इतुकी न विकसली प्रीती
तुझ्या संगतींत वाटे
मला माझ्या वेदनांची भीती

निशेउषेच्या सौंदर्यीं
गडे तुझी माझी मिठी जुळे
पण ज्वालांच्या घर्गीत
माझी दुपार एकटी जळे !

मुंबई
९-१०-५२

# अहो जग पुढें गेलें

घराघरांत घुमले तेव्हां तुक्याचे अभंग
निजलेल्या मनांतला प्रकटला पांडुरंग
अमृतातें पैजा जिंकी अशी ज्ञानेशाची ओवी
होती आणीत मनांना नवी अमृत-पालवी
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
विसरा तो जुना घोष : ‘ रखुमाईवरा बापा ’
आतां ओठाओठावर ‘ लारीलप्पा लारीलप्पा ’

आहे फार जुनी कथा पाहूनिया क्रौंचवध
वाल्मीकीच्या करुणेंत फुले अनुष्टुभ छंद...
जुन्या गोष्टी कशासाठीं ? काव्य विसरा हो राव
सध्यां रहस्यकथेला आहे बाजारांत भाव
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
आतां असें कांहीं लिहा ज्यांत सहाच पानांत
चित्तथरारक असे खून पडतील सात !

कौतुक त्या प्रतिभेचें...दगडांत निश्चेतन
जिच्या स्पर्शें अंतरींचें झालें साकार स्पंदन
सात रंगांचा सोहळा अजिंठ्याच्या पाषाणांत
उभें साकार सौंदर्य वेरूळच्या दगडांत

आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
नको अजिंठा-वेरूळ मूर्ती तोडा किंवा फोडा
गाडीभोवतीं नटीच्या आतां लोकांचा गराडा

काल वाचलें कुठेंसें म्हणे कुणीसा निघाला
मागण्यास भूमिदान पायीं चालला एकला
म्हणे आत्म्याच्या शक्तीनें निर्मायची जगीं शांती
म्हणे प्रेमाच्याच पोटीं आहे दडलेली क्रांती
आतां सारें बदलेलें
अहो जग पुढें गेलें
शीण पायांना उगीच कशासाठीं व्यर्थ सांगा
लावूं तिकिटांच्यासाठीं थिएटरा पुढें रांगा !

आतां संस्कृती म्हणजे रेशमाचा बुशकोट
ज्याच्यावरती चित्रित हत्ती, घोडे आणि उंट
आतां संस्कृती म्हणजे लाल रंगलेले ओठ
आतां संस्कृती म्हणजे प्रचार नि जाहिरात
आतां सारें बदललें
अहो जग पुढें गेलें
आतां तारणारा एक मंत्र जपा, मंत्र जपा :
" लारीलप्पा लारीलप्पा लारीलप्पा लारीलप्पा "

मुंबई
१२-१०-५२

# भार

पुरे नाहीं का हा भार ?
ओझें पाठीशीं घेऊन
किती वेळ फिरणार ?

झाली आतां सांजवेळ,
कुरणांत सावल्यांचा
पाठशिवणीचा खेळ !

पात्र नदीचें उतट,
नभीं तरती ढगांचे
गोल सोनेरी घुमट !

पानांची ही कुजबुज
दाटे वाऱ्याच्या मनांत
कसलेंसें गंधगूज !

भार वाहण्यांत सारें
असें झिजत झुरत
कणकण आयु सरे

भाराखालींच चाललें
क्षणाक्षणानें चुरून
तुझें गीत मनांतलें !

इथें नदीच्या काठाशीं
बोल उतरून ओझें
बोलघेवड्या लाटांशीं !

आहे मोकळी ही हवा
ओल्या मातींत उद्दंड
भरलेला जोम नवा !

पुरे नाहीं का हा भार ?
ओझें पाठीशीं घेऊन
किती वेळ फिरणार ?

मुंबई
६–११–५२

# पळवाट

नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

पाप करावें सकाळीं आणि नामजप रात्रीं
काळ्या बाजारींचें धन दान करावें सत्पात्रीं
शल्य विसरण्यासाठीं नको कांहींच का सोय ?
उभें आहे त्याचसाठीं भव्य दिव्य देवालय ! !
पाप साचलें मनांत पण बघा मंदिरांत
धूप नैवेद्य आरती आणि प्रसादाचा थाट
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट

दबलेल्या वासनांची भुतावळ छळूं लागे
मृत आशाआकांक्षांची सेना उशागत जागे
स्वप्नें सार्थ करण्याचें मनीं सामर्थ्यच नुरे
त्राण जगण्याचें सारें हाय ! पळण्यांत सरे
अशा निस्त्राण मनाला नको कांहींच का वाट ?
असो चिल्लर थिल्लर पण हवा बोलपट
किती सुखकर वाटे दोन तास अंधारांत !
दुःख विसरावें अशी जादू नटीच्या डोळ्यांत !
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

इथें नदीच्या काठाशीं
बोल उतरून ओझें
बोलघेवड्या लाटांशीं !

आहे मोकळी  ही हवा
ओल्या मातींत उदंड
भरलेला जोम नवा !

पुरे नाहीं का हा भार ?
ओझें पाठीशीं घेऊन
किती वेळ फिरणार ?

मुंबई
६–११–५२

# पळवाट

नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

पाप करावें सकाळीं आणि नामजप रात्रीं
काळ्या बाजारींचें धन दान करावें सत्पात्रीं
शल्य विसरण्यासाठीं नको कांहींच का सोय ?
उभें आहे त्याचसाठीं भव्य दिव्य देवालय ! !
पाप साचलें मनांत पण बघा मंदिरांत
धूप नैवेद्य आरती आणि प्रसादाचा थाट
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट

दबलेल्या वासनांची भुतावळ छळूं लागे
मृत आशाआकांक्षांची सेना उशागत जागे
स्वप्नें सार्थ करण्याचें मनीं सामर्थ्यच नुरे
त्राण जगण्याचें सारें हाय ! पळण्यांत सरे
अशा निस्त्राण मनाला नको कांहींच का वाट ?
असो चिल्लर थिल्लर पण हवा बोलपट
किती सुखकर वाटे दोन तास अंधारांत !
दुःख वितळावें अशी जादू नटीच्या डोळ्यांत !
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

मनीं शून्यता भयाण वाटे एकांताची भीती
असो कुठेंही परंतु गर्दी हवी सभोंवतीं !
हवा प्रभावी पुढारी शब्दबाजीचा असर,
आणि व्यक्तीस पडावा व्यक्तित्वाचाच विसर
प्रचंड त्या आवाजानें उरीं पोकळी भरावी
धुंद शब्दप्रवाहांत मुळीं जाणीव नुरावी !
सभा प्रचंड संपावी टाळ्यांचिया गजरांत
आणि घरीं आल्यावर झोप लागावी कैफांत
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

जन्म होण्यापासून तों थेट मरणापर्यंत
आहे जीवन म्हणजे एक जुगार अनंत
शिणलेल्या मेंदूसाठीं हवा कैफ कांहीं तरी
मरगळल्या नसांना हवी थोडी तरतरी !
कोण म्हणे जुगारांत आहे मनाची विकृती ?
कोड्यापासून आमुची घोड्यापर्यंत प्रगती !
रात्रंदिवस विचार घालूं ' कट ' किंवा ' खट '
ध्यानीं मनीं स्वप्नीं आतां शब्दकोड्याची चौकट
नको प्रकाशाची वाट, नको अमृताची वाट,
फक्त हवी पळवाट नवी नवी पळवाट !

मुंबई
७-११-५२

# मज नव्हतें ठाउक

तंद्रींत आपुल्या असायचा तो जेव्हां
मज सुचतच नव्हतें दुसरें कांहीं तेव्हां
प्राध्यापक होते करीत प्रवचन कांहीं
मज शब्दहि त्यांतिल परंतु कळला नाहीं !
मी वेडी होउन टकमक पाहत होतें
मज त्याच्यावांचुन कांहीं दिसतच नव्हतें !
मी इतुकी भित्री...असें कसें मग घडलें ?
मज नव्हतें ठाउक; अजून नाहीं कळलें !

सहलीच्या वेळीं आणिक आम्ही दोघें
चालतां चालतां नकळत उरलों मागें;
वाटेंत चुकुनिया स्पर्श तयाचा झाला
अन् मनांत माझ्या गुल्मोहर मोहरला !
मी नकळे कैसी बदलें होउन धीट :
वाटतें मज कधीं सरूं नये ही वाट !
मी इतुकी भित्री...असें कसें मग घडलें ?
मज नव्हतें ठाउक; अजून नाहीं कळलें !

त्या दिवशीं होतें संमेलन...आठवतें,
नव कृष्णवसन मी नेसुन आलें होतें;
मज पाहतांच तो स्तिमित उभा राहियला
अन् ओळ इंग्रजी कवितेंतिल पुटपुटला :

‘सौंदर्ययुता ती चाले रजनीऐसी
या नक्षत्रांकित कृष्ण तलम परिवेषीं…’
क्षण पिसापरी हें शरीर हलकें झालें
अन् लहरत तरळत वाऱ्यावर भुरभुरलें !
मी हसलें आणिक गडबडलें…गोंधळलें
अन् शब्दांवांचुन सारें बोलून गेलें !
मी इतुकी भित्री…असें कसें मग घडलें !
मज नव्हतें ठाउक, अजून नाहीं कळलें !

त्या संध्याकाळीं सागरतीरावरतीं
रंगांची होती मैफल क्षितिजावरतीं !
पाण्यांत तरंगत होतें केशर भिजलें
वर फेनफुलांचे शुभ्र गुच्छ झुललेले !
मी करांत माझ्या कर त्याचा घेउनिया
हिंडलें स्वैर रंगांची पाहत दुनिया;
त्या रंगांहुनिही अद्‌भुत सुंदर किमया
रंगवीत होती क्षणाक्षणानें हृदया !
हळुहळू पसरला तम कंपित…हळुवार
अन् ओढ लागली पाण्याला अनिवार !
मज नकळे अवचित जादू कसली घडली
अन् माझ्याभवतीं मिठी तयाची पडली;
अस्तित्वच माझें गमलें एक सतार
पालवी स्वरांची फुटुनि हसे जड तार !
अधरांवर जुळतां अधर भासलें मजला
प्रत्येक क्षणाचा थरथरता स्वर झाला;

का स्वप्नच होतें जग भवतींचें सारें ?
का स्वप्नच होत्या लाटा...तारे...वारे ?
मी इतुकी भित्री...असें कसें मग घडलें ?
मज नव्हतें ठाउक; अजून नाहीं कळलें !

मुंबई

११-११-५२

# सुंदर आहे माझी वासना

सुंदर आहे माझी वासना
सुंदर जशी आषाढघनांची उन्मत्त गर्जना !
सुंदर जसें तलम आकाश...
पांढरा प्रकाश...
उडते पक्षी...
चांदण्यावरील छायांची नक्षी...
बेफाम नदीचें मत्त समुद्राशीं गाढ आलिंगन
रातराणीनें वाऱ्याला दिलेलें मादक चुंबन
सुंदर जसा रात्रीच्या गडद काजळीमधून
लखलखणारा विजेचा तराणा
सुंदर आहे माझी वासना

करून आपुला सुतकी चेहरा म्हणाले कोणी :
वासना म्हणजे पापाची खाणी !
वासना म्हणजे अनीति अनीति
वासना म्हणजे मृत्यूची दूती
हवा ना ईश्वर ? हवी ना मुक्ति ?
पळा रे पळा रे हिचियापासून
अवघें पुण्यच जाईल नासून !
क्षितिजावरतीं केशरी अंजिरी रंगांत न्हाऊन
हीच मायाविनी घाली भुलावण,
नकोच नकोच हिचें तें दर्शन !
सौंदर्यवतींचें प्रमत्त यौवन हिचें इंद्रजाल

अवघें सौंदर्य इथूनतिथून समजा खुशाल
हिचें हलाहल !
मिटून लोचन
तपस्या करून
मिळवा विजय हिचियावरतीं
वासना म्हणजे मृत्यूची दूती
शांतं पापम् !

आठवतो ना ऋषि पराशर ?
केवढें सामर्थ्य ! प्रत्यक्ष ईश्वर !
लोचनामध्यें तपाची दीप्ती
पुण्याचें गाठोडें पाठीवरतीं !
भर दुपारीं
नाचऱ्या पाण्याला ओढच भारी
पाऱ्याच्या रंगाची एखादी मासळी
लकाके...उसळे...घेऊन उसळी
चंचल पाण्याच्या नाचऱ्या लयींत होडी खालींवर
धीवरकन्यका सत्यवतीचें तसेंच ऊर
कृष्ण भुवयांचें ताणलें धनुष्य
फुलानें विंधिला पाषाण प्रत्यक्ष !
मदनविव्हल म्हणे पराशर :
' ये ना सत्यवती, जवळ सत्वर ! '
लाजे सत्यवती : ' काय हें भलतें...असतां दुपार ! '
हसला धुंदींत ऋषि पराशर
केवढें सामर्थ्य, प्रत्यक्ष ईश्वर !...
क्षणांत मालवे जळती दुपार
पसरे भोंवतीं चंचल...कांपरा...सुगंधी अंधार !

होय मत्स्यगंधा योजनसुगंधा...
...वाऱ्याच्या मनांत नाचलीं गाणीं
...भिजे चांदण्यांत लाजरें पाणी !
आणिक पुढतीं—
व्यासाचें गाठोडें झाडाच्या मुळाशीं
पुण्याचें गाठोडें घेऊन पाठीशीं निघे पराशर

सुंदर आहे माझी वासना
सुंदर जशी आषाढघनांची उन्मत्त गर्जना !
दिसावें कसें आंधळ्या डोळ्यांस
हिचें हें लावण्य, सौंदर्यविलास ?
दांभिक दुबळे :
कोठून तयांस हिचिया शक्तीची विराट प्रतीति ?
मरणापूर्वींच पावलोपावलीं भेकड मरती !

समर्थ सुंदर आहे वासना
हिचियाभोंवतीं सहाही ऋतु हे धरिती फेर
उघडा लोचन; पहा चौफेर !
हीच वसंतांत, फुलांत, पानांत,
मातीच्या मनांत
प्रेरीत पेरीत सौंदर्य जाते
लावण्यवतींच्या धुंद कटाक्षांत
हिच्याच खड्गाचें अमोघ पातें !
हिचेंच यौवन वर्षेच्या सहस्र धारांत धुंद
चंचल झऱ्यांत हिचाच छंद,
दीर्घ चुंबनांत, मादक मिठींत
सुगंधी उत्सव हिचिया गानाचा
हिच्याच स्पर्शें मातींत संचार हिरव्या प्राणाचा

हिचीच प्रेरणा भूमींत रुजते, जळांत न्हाते,
वरतीं सरते तृणाचें हिरवें होऊनि पातें
हीच निर्मितीच्या करींची सतार
पांच इंद्रियांच्या तारांवरतीं
मोहरे अमर जीवनशृंगार !

सुंदर आहे माझी वासना
सुंदर जशी आषाढघनांची उन्मत्त गर्जना :
जिच्यांत लपली नव्या सृजनाची अद्‌भुत प्रेरणा !

काकावाडी : वर्धा
२८–२–५३

# हरवलें गीत मिळे

किती तरी दिवसांचें हरवलें गीत
आज अचानक मिळे पानांच्या जाळींत !

विखुरले सावल्यांचे तुरे जागोजाग
डेलियाच्या फुलापरी पश्चिमेला ढग
रुपेरी तंद्रींत उभें स्वप्नापरी जग
उरीं मुग्ध सूर जशी पहिलीच प्रीत
हरवलें गीत मिळे पानांच्या जाळींत !

चंद्रज्योतीच्या फुलांची झगमग जळीं
लाख पाकळ्यांनीं फुले चांदण्याची कळी
दूरची चांदणी हसे लाजूनिया खुळी
झुले पारा लाटांचिया निळ्या साखळींत
हरवलें गीत मिळे पानांच्या जाळींत !

चंदेरी धुक्यांत दूर झाडांचिया हारी
रातकिड्यांची तिथेंच घुमे एकतारी !
निशिगंधाच्या भोंवतीं वारा फेर धरी
चांदण्याच्या मौनावर गंध उधळीत
हरवलें गीत मिळे पानांच्या जाळींत !

हिंडूनही त्रिखंड जें जाणवलें नाहीं,
शोधिलें अखंड; पण रित्या दिशा दाही
तेंच उरीं अभावित तरळून जाई :
शांत स्वरांच्या पापण्या हळू उघडीत
हरवलें गीत मिळे पानांच्या जाळींत !
किती तरी दिवसांचें हरवलें गीत
आज अचानक मिळे पानांच्या जाळींत

काकावाडी : वर्धा
१–६–१९५३

# कसें काय अन् कोठें चुकलें ?

मी शास्त्रें हीं कोळुनि प्यालों,
असे मुखोद्गत पुराण, गीता;
ईश्वर आहे अथवा नाहीं
बसून करितों चर्चा आतां !

जाणतसें इतिहास जगाचा;
पारायण हो विज्ञानाचें;
खगोल-भूगोलादिक विद्या
माझ्या जिव्हेवरतीं नाचे !

तत्त्वज्ञानें, समाजरचना
यांतहि मी झालों पारंगत;
अर्थशास्त्र, परमार्थशास्त्रही
यांची तर नेहमिची संगत !

आषाढाच्या पहिल्या दिवशीं
जेव्हां जमले मेघ अचानक
पागल वारा, पागल धारा
खड्गापरि बिजलीची लखलख !

थेंब बिलोरी वेचुं लागलीं
ओणवून गवताचीं पातीं
मागें सारित केस आपुले
खट्याळ छाया भिजती न्हातीं !

जमून पोरें रस्त्यावरतीं
अंगावरतीं झेलित धारा
गाउं लागलीं धुंद अनावर :
'आला पाउस—आला वारा !!'

कुणीं कोंडिली मुठींत अपुल्या
थेंबांची चमचमती दौलत
कुणीं घेतली खट्याळ गिरकी
लचकत...थबकत...झिंगत...डोलत !

मींही पाहियलें आकाशीं
पुन्हा एकदां डोळे उघडुन
ती मस्ती पण नव्हती हृदयीं
नव्हतें तसलें अद्भुत दर्शन

सहस्र धारांची ती जादू
दिसून मजला दिसली नाहीं
अणूअणूंतिल पागल धुंदी
कळली; पण जाणवली नाहीं !

आतां बसलों आहें शोधित
दीर्घ तपस्येंतहि जें हुकलें
हात कपाळा लावुनि बघतों
कसें काय अन् कोठें चुकलें !

काकावाडी : वर्धा
२–३–१९५३

# तुज आठवतें का ?

तुज आठवतें का ?...

हातांत हात गुंफून करुन साखळी
धुंदींत भटकणें : वाट सदा मोकळी !
काधिं स्तब्धच नुसतें पाहत वसणें जळीं
तुज आठवतें का ?

कसलेंसें घेउनि पान एकदां करीं
फिरविलेंस माझ्या हळुच पापणीवरी
थरथरत शहारत गेलें कांहीं उरीं
तुज आठवतें का ?...

कधिं कातरवेळीं घट्ट तसें बिलगुनी
दूरांत कुठें तरि खिळवुनिया पापणी
भारावुनि झाले शब्द मूक ज्या क्षणीं
तुज आठवतें का ?...

हळुहळू तरूंच्या गूढतरल सावल्या
पंखापरि पसरत संथ गहन जाहल्या
दोघांच्या छाया...एकरूप आपुल्या !
तुज आठवतें का ?...

काकावाडी : वर्धा
१०-३-५३

# फुंकर

ग्रीष्मामधल्या भर माध्यान्हीं जेव्हां
निपचित मूर्च्छित पडून असते माती;
शिरीं तप्तता झेलित डोंगर बसती,
शून्यपणानें खिन्नपणानें झाडें
पाहत बसती मृगजळ झुळझुळणारें !

गरम झळांचे लावुनि पंख खुशाल
उगीच भटकत असतो वारा :
सांगायाचें मनांत नसतां कांहीं
बसतो बोलत निष्कारण पर्णांशीं !
हिरवीं झाडें मुक्या मेंदिचीं संथ उभीं हारीनें,
पानांच्या झुबक्यांत दडुनिया त्यांच्या
मुठीएवढा कुणी लाजरा पक्षी
शीळ घालतो
चंचल...नाजुक...
भित्री...लवचिक !

पापणिवरतीं जळत्या नीरवतेच्या
तेवढीच ती फुंकर गार स्वराची !

वर्धा
मार्च १९५३

## विषाद

विद्धपंख पक्ष्यापरी निःशब्दता पडे
आकारांचें जग सारें अंधारांत बुडे
क्षीणतेज चमकतो दूर एक तारा
खिन्नतेचें ओझें वाही थकलेला वारा !

मंत्रमूढ...भारलेल्या विचित्र या छाया
दचकती जरा फांदी लागतां हलाया !
गिळूनिया सळसळ पिंपळाचीं पानें
निपचित अंधारांत उभीं मुकाट्यानें !

स्तब्ध शांत रहा नको बोलूं अशा वेळीं
मुळीं नको गुंफूं रित्या शब्दांची साखळी
शब्द तेच खरे...पण उडाला सुगंध
सूर तेच...पण नाहीं मनांत आनंद !

काळोखांत विषादाची विचित्र गुंफण
जाणिवेंत खुपतात गंजलेले क्षण !

मुंबई
१९-४-५३

## गहन तुझ्या डोळ्यांत

दा. क्र. १६९८५

गहन तुझ्या डोळ्यांत खोल बुडतांना
नकळत मज माझेपण परकें झालें;
शब्दहि होते ओठांवरतीं आले
परंतु अवचित त्यांचे...थेंब दवाचे झाले !

...विस्मृतिच्या अतिगहन वनांत सुदूर :
निगूढ तिथल्या कळकांच्या हारींत
निळें पाखरूं होउनि गेलें उडून मनचें गूज
नव्या वधूच्या सलज्ज आतुर स्वप्नापरि अन् जेथें
थरथरलें हळु वाऱ्याचें अलगूज...!

...बुडतच जाणिव होती
अनुभूतीच्या संथ गहन डोहांत
अचल समाधित होतें जेथें स्थिरावलेलें पाणी
वारा बोलत नव्हता
नव्हतीं हालत पानें
आणि स्तब्धता होती
आर्त पापणीपरी पसरली पाण्यावर हलकेच
गहन तुझ्या डोळ्यांत खोल बुडतांना
गूढ गवसलें होतें अवचित कांहीं:
पार मनाला मुळीं न ज्याचा लागे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वल्पमत
अनुक्रम ........ ६८६६९ ........ वि .........
.... १०८ ........ ता. २१/३/६१

शिशिरामधल्या गूढ पहाटे जैसा
समुद्र जावा धुक्यांत पार बुडून,
तसेच होते बुडले
स्वतःच्याच गूढतेंत क्षण ते सारे !

गहन तुझ्या डोळ्यांत खोल बुडतांना
क्षणभर मज माझेपण परकें झालें
शब्दहि होते ओठांवरती आले...
परंतु अवचित त्यांचे थेंब दवाचे झाले

मुंबई
२६–६–५६

# बरेच दिवस

बरेच दिवस
कुणासाठींच झुरलों नाहीं
बरेच दिवस
हुरहुरून फिरलों नाहीं

बरेच दिवस
खदखदून हसलों नाहीं
दूरच्या ढगांत
डोळे लावून बसलों नाहीं

बरेच दिवस
रोजची वाट चुकली नाहीं
बरेच दिवस
मनांत वीज झुकली नाहीं

बरेच दिवस
रस्त्यावरतीं थांबलों नाहीं
विसर पडून
तासन् तास बोललों नाहीं

बरेच दिवस
शीळ घालीत हिंडलों नाहीं
बरेच दिवस
माझ्यांत मीच बुडलों नाहीं

वरेच दिवस
कैफ चढून रंगलों नाहीं
वरेच दिवस
जगूनसुद्धां जगलों नाहीं

मुंबई
२९-९-५३

# प्रतीक्षा

कुंद रितेपण,
मान टाकुनी त्यावर झुरती
केविलवाणे शब्द !
चमचमती क्षण
आणि ठिबकुनी तमांत बुडती;
पुन्हा थंड…निःस्तब्ध !

जाणिव आंतुन
पंखांपरि चिमणीच्या भिजल्या
फडफडते…थरथरते !
आणिक बिचकुन,
भिजलीं घेउनि पिसें हळुच
वळचणींत अंधुक शिरते !

अधिकच खुपते
स्थिरावलेले शब्द जिच्यावर
ती चिरपरिचित कक्षा !
मनांत उरते
काळोखांतच हुरहुरणारी
धूसर आर्त प्रतीक्षा !

मुंबई
१३-७-५३

# भीति

जुन्या वडाच्या झाडापाशीं
अर्ध्या सुकल्या डोहाकाठीं
पायघोळ छायांचा डगला
घालुनि फिरते काळी भीती !

सुकलेलीं गळलेलीं पानें
डोहांतिल पाण्यावर कुजती
आणि लोंबत्या पारंब्या त्या
थरथर हलल्यापरी भासती !

कातरवेळीं एक गुराखी
इथें झपाटुनि होता गेला
आणि घरीं जाण्याच्या आधिंच
रक्त ओकुनी मधेंच मेला !

लुळी...तोतरी तीच आठवण
वळे बोबडी, रक्त गोठतें
बीळ पाडुनी अंधाराला
भेदरलेली जाणिव लपते !

...अजून दिसतें झाड वडाचें
अर्ध्या सुकल्या डोहाकाठीं
पायघोळ छायांचा डगला
घालुन फिरते मनांत भीती !

मुंबई
२५-७-५३

# धुक्याचा हा पूल

रफू केलेल्या भावना
किती काळ मिरवाव्या ?
आणि विकल शब्दांत
कळा नवीन ओवाव्या ?

ओल्याचिंब आठवणी...
त्यांचा कितीसा आधार :
जिथें अनुभव विरे
उरे छायेचा व्यापार !

तुझ्या–माझ्यामधें आहे
नवा धुक्याचा हा पूल
चाले ज्यावर धूसर
अनोळखी ही चाहूल !

जाणवतें तुला...मला
भासांत या सत्य नवें :
खिडकीच्या भिजलेल्या
काचेंतून जसे दिवे ! !

उर्मी धुक्यांत आपण
सारें कांहीं विसरून
उडे मधलें अंतर
फूलपाखरू होऊन

सुख निश्चिताचें विरे
उरे धुक्याचा हा दुवा
व्यर्थ भासलें त्यांतच
अर्थ होता असा नवा !

मुंबई
१-८-५३

## थेंब

मनांत नाहीं
मुळींच माझ्या कांहीं;
फक्त वाजतें आहे :
नितळ लाजरें
ओलें पाउल
एक चिमुकल्या थेंबाचें.

मुंबई
४-८-५३

# अकस्मात

अश्मयुगांतिल जर मी मानव असतों
आणिक त्याच्या डोळ्यांनीं तुज बघतों
किती असुंदर असते मज जाणवले
गालांवरचे गुलाब उसने असले
जपुनि कोरिल्या या भुवया अन्
हा लटका भ्रूभंग
फिक्कट ओठांवरचा कृत्रिम
आणि लाल हा रंग !

बघतां बघतां
आणि अकस्मात
जाणिव गेली भेदुनि थर काळाच
आठवणींवर लगडुनिया बसलेले...

...रानामधल्या झाडापरि तूं
उभी राहिलिस पुढतीं
शोषुनि घेसी खोल भूमिंतिल तूं हिरवें चैतन्य
फांद्यांच्या हातांनीं पिउनी मुसळधार पर्जन्य
स्पर्शें तुझिया गरम जाहलीं कानशिलें ग्रीष्माचीं
मिठींत तुझिया शमे हुडहुडी आणि आर्त शिशिराची
वसंत आला घेउनि हृदयीं आग

आणि लसलसे तुझ्या पोपटी पानांतुन अनुराग:
हिरव्या चैतन्याचीं झालीं हिरवीं हिरवीं पानें
जीवन होतें उघड्यावरचें उत्कट उघडें गाणें

मुंबई
८-८-५३

# काळी कड सावलीची

काळी कड सावलीची
प्रकाशाला शिवूं बघे
आणि थिजल्या ओठांनीं
पुन्हा काळोखांत रिघे

स्वतःलाच उसवीत
बसे जुन्या वडातळीं
चाचपीत जाणिवेचीं
खोल मुळें जीं पातळीं

काळें हिरवें शेवाळ
खिन्नतेचें तमावर
फांद्या आंधळ्या वडाच्या
ढाळितात हुरहूर

गुंतलेली काळी कड
स्वतःभोंवतींच फिरे
आणि अंध वडातळीं
फक्त काळी ग्लानी उरे

मुंबई
२३–८–५३

# कसरत

तेव्हां पाहियला चंद्र
त्याच्या नित्य नव्या कळा...
आतां सत्य एक उरे :
रुपयाचे आणे सोळा :

सांभाळीत सोळा आणे
चंद्र जपायचा मनीं
वर उडायचें जरी
रितेपणाचाच धनी !

तोल सावरीत अशी
तारेवर कसरत
धन टाळ्यांचें पदरीं
जरी मन घसरत !

हळूहळू विरघळे
चंद्र मनीं लपलेला
निंबोणीच्या झाडामागें
फक्त अंधार उरला !

तरी तारेवर उभा
सावरीत कसेंवसें
गर्दी आहेच भोवतीं
धुंद टाळ्या...धुंद हसें !

मुंबई
८-९-६३

१६८७५

## खडक

निवली खळबळ
निवांत झुलती लाटा
कधींच गेल्या
रेतीवरल्या
पुसून पाउलवाटा

पुळणीवरतीं
तरल ओलसर शांती
झिळमिळते वर
तृप्त उन्हाची
पिवळी रेशिमकांती

REFBK-0016975
REFBK-0016975

उठती अलगद
पाण्यावरति तरंग
नुकता न्हाउन
संथपणानें
खडक वाळवी अंग

६८४६९
१०९६
०५।०२।
११।३।०९

मुंबई
१२-९-५३